❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती शुक्रवार, दि. ०२ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २७७ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



सहलीसाठी आलेल्या 8 विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू




दिवेआगर समुद्रकिनारी मोठी दुर्घटना : पोलिसांनी सर्व मृतदेह काढले बाहेर

■ रायगड (दै. संध्या)

कोकणातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या रायगड जिल्ह्यातील दिवेआगर समुद्रकिनारी गुरुवारी (1 ऑक्टोबर) मोठी दुर्घटना घडली. पुणे जिल्ह्यातील आळंदी येथून सहलीसाठी आलेल्या 8 विद्यार्थ्यांचा समुद्रात बुडून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. समुद्रातील पाण्याचा अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडल्याचे सांगितले जात आहे. या घटनेमुळे दिवेआगर परिसरात मोठी खळबळ उडाली असून समुद्रकिनारी शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आळंदी येथील विनर्स अकॅडमी या खासगी शिकवणी वर्गातील विद्यार्थी सहलीसाठी दिवेआगर येथे आले होते. या सहलीत एकूण 42 विद्यार्थी आणि 2 शिक्षक, असे 44 जण सहभागी झाले होते. समुद्रकिनारी गेल्यानंतर काही विद्यार्थी पाण्यात पोहोण्यासाठी उतरले. मात्र, समुद्रातील पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने काही विद्यार्थी पाण्यात ओढले गेले. या दुर्घटनेत 8 विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. सर्व मृतदेह समुद्रातून बाहेर काढण्यात आले असून ते बोर्ली पंचतन प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आले आहेत. मृत विद्यार्थ्यांपैकी सर्वजण अकरावीचे विद्यार्थी असल्याची माहिती समोर आली आहे.

सहलीसाठी आनंदाने घराबाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांचा अशा प्रकारे दुर्दैवी अंत झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेची माहिती आळंदी परिसरात समोर येताच नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन, पोलीस आणि नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. महाकाली वॉटर स्पोर्ट्सच्या कर्मचाऱ्यांनीही मृतदेह बाहेर काढण्यासाठी मदत केली. स्थानिक नागरिकांनी बचावकार्याला सहकार्य केले. प्रशासनाकडून घटनास्थळी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असून दुर्घटनेच्या नेमक्या कारणाचा तपास सुरू आहे. या घटनेची माहिती मिळताच प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. मंत्री भरत गोगावले आणि आदिती तटकरे यांनी प्रशासनाशी संपर्क साधून घटनेची माहिती घेतल्याचे सांगण्यात आले आहे.

सहलीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांपैकी 8 जणांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दुर्घटनेची माहिती मिळाल्यानंतर पालक आणि नातेवाईक घटनास्थळी तसेच आरोग्य केंद्राकडे दाखल होत आहेत. दरम्यान, प्रशासनाकडून मृत विद्यार्थ्यांची ओळख आणि इतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली जात आहे. रायगडच्या समुद्रकिनाऱ्यावर पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात. मात्र, समुद्रात पोहताना पाण्याची खोली, प्रवाह आणि हवामानाचा अंदाज घेणे आवश्यक असल्याचे या दुर्घटनेने पुन्हा अधोरेखित केले आहे. या दुर्घटनेनंतर रायगड जिल्ह्यातील मंत्री आदिती तटकरे यांनी स्थानिक प्रशासनाशी तातडीने संपर्क साधल्याची माहिती दिली. दुर्घटनेत बचावलेल्या विद्यार्थ्यांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळावेत, अशा सूचना प्रशासनाला दिल्याचे त्यांनी सांगितले. बाहेरून सहलीसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना समुद्रातील पाण्याच्या खोलीचा आणि प्रवाहाचा अंदाज नसतो. त्यामुळे अशा दुर्घटना घडू शकतात. समुद्रकिनारी असलेली रेस्क्यू टीम पर्यटकांना आवश्यक मार्गदर्शन करत असते. मात्र, दिवेआगर येथे घडलेली दुर्घटना अत्यंत दुर्दैवी असल्याची भावना तटकरे यांनी व्यक्त केली. मृत विद्यार्थ्यांच्या पालकांच्या संपर्कात प्रशासन असल्याचेही त्यांनी सांगितले. दुर्घटनेनंतर बचावकार्य, उपचार आणि पुढील प्रशासकीय प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांकडून जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क

दिवेआगर समुद्रकिनारी झालेल्या दुर्घटनेची माहिती मिळताच उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. त्यांनी दुर्घटनेची सविस्तर माहिती घेत बचावकार्य आणि मदतकार्याबाबत प्रशासनाकडून आढावा घेतला. तसेच परिस्थितीवर प्रशासनाने तातडीने लक्ष ठेवावे आणि आवश्यक ती मदत त्वरित उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. दुर्घटनेत मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांप्रती त्यांनी दुःख व्यक्त केले आहे.

मृत विद्यार्थ्यांची नावे

- राजवीर वहिले
- सोहम भांडवलकर
- कौस्तुभ दौंड
- यश वानखेडे
- कैवल्य वासंकर
- तन्मय वहिले
- सुमित अहिरे
- प्रणव बनसोडे

थोडक्यात...



पोत्यात आढळला तरुणाचा मृतदेह

मुंबई : दैनिक संध्या

मुंबईतील अंधेरी पश्चिम येथील वर्सोवा समुद्रकिनारी एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पोत्यात बांधलेला पुरुषाचा मृतदेह सापडल्याने खळबळ उडाली आहे. हत्या करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न झाला असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. देवाची वाडी, जेपी रोड येथील हिंदू स्मशानभूमीच्या मागील बाजूस आज सकाळी ही घटना उघडकीस आल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, मृत व्यक्तीचे वय अंदाजे 35 ते 40 वर्षे असून, मृतदेह फुगलेल्या अवस्थेत आढळला आहे. समुद्रकिनारी फिरण्यासाठी आलेल्या नागरिकांना पोत्यात काहीतरी बांधलेले वाहून आल्याचे दिसल्यानंतर त्यांनी पोलिसांना याबाबतची माहिती दिली. लगेत पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून ब्लेडच्या साह्याने पोते उघडले असता त्यामध्ये पुरुषाचा मृतदेह आढळला. या नंतर पोलिसांनी मृतदेह कूपर रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. तेथील डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. अज्ञात व्यक्तीची हत्या करुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह पोत्यात बांधून समुद्रात फेकल्याचा पोलिसांचा प्राथमिक संशय आहे. याप्रकरणी वर्सोवा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम 103 (1) आणि 238 अंतर्गत अज्ञात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी वर्सोवा पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेत आहेत.

यवतमाळ : कंटेनरने नागरिकाला चिरडले

यवतमाळ : दैनिक संध्या

यवतमाळ जिल्ह्यातही धक्कादायक घटना घडली आहे. आदिलाबादकडून नागपूरकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या एका कंटेनरने रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकाला चिरडल्याची दुर्घटना यवतमाळच्या पांढरकवडा तालुक्यातील केळापूर परिसरात घडली. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला. संतोष औरुंडवार (47) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या घटनेमुळे संतप्त ग्रामस्थांनी व नागरिकांनी राष्ट्रीय महामार्गावर मोठमोठे गोटे ठेवून वाहतूक पूर्णपणे बंद केली. मृतक संतोष औरुंडवार हे आपल्या शेतात जनावरांना बांधून सायंकाळच्या सुमारास घरी परतत होते. यादरम्यान आदिलाबादकडून नागपूरच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनरने HR 55 AM 8752 त्यांना जोरदार धडक दिली. यामुळे संतोष औरुंडवार यांचा जागीच मृत्यू झाला.

सोसायटी पुनर्विकासाबाबत मोठा निर्णय!

■ मुंबई (दै. संध्या)

■ बिल्डरांची मनमानी चालणार नाही, 51% संमतीसह निबंधकांची थेट नजर अन् VIDEO शूटिंग, जाणून घ्या नवे नियम

सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांच्या पुनर्विकास प्रक्रियेतील अपारदर्शकता संपवण्यासाठी आणि सभासदांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी राज्य शासनाच्या सहकार विभागाने सुधारित मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. या नव्या नियमांमुळे पुनर्विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर सर्वसामान्य सभासदांचा थेट सहभाग सुनिश्चित होणार असून, व्यवस्थापन समिती किंवा प्रशासकांच्या मनमानी कारभाराला मोठा आळा बसणार आहे. सहकार विभागाने बुधवारी परिपत्रक काढून 4 July 2019 चा जुना शासन निर्णय व त्यासंबंधित परिपत्रके रद्द केली असून, ही नवीन सुटसुटीत व पारदर्शक कार्यपद्धती तत्काळ प्रभावाने लागू केली आहे. पुनर्विकासाचा कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार फक्त कायद्यानुसार निवडून आलेल्या व्यवस्थापन समितीलाच असेल. निबंधकांनी नियुक्त केलेले प्रशासक, अधिकृत मंडळ किंवा तात्पुरत्या अधिकाऱ्यांना पुनर्विकासाबाबत निर्णय घेता येणार नाही. हे नियम विकासकामार्फत होणारा पुनर्विकास, स्वयंपुनर्विकास (Self-Redevelopment), समूह पुनर्विकास आणि संघामार्फत होणाऱ्या पुनर्विकासाला समान रीतीने लागू राहतील. प्राथमिक निर्णय: पुनर्विकासाच्या प्राथमिक मंजुरीसाठी एकूण सभासदांपैकी किमान 51% सदस्यांची संमती आवश्यक असणार आहे.

अभिजित दीपकेंकडून शिवाजी महाराजांचा अपमान?

■ 'कॉकरोच'च्या फोटोवरून नितेश राणेंचा संताप, माफी मागण्याची मागणी

■ मुंबई (दै. संध्या)



कॉकरोच जनता पार्टीकडून 2 ऑक्टोबर रोजी मुंबईतील शिवाजी पार्क येथे प्रस्तावित आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले आहे. भाजप आमदार नितेश राणे यांनी कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांच्यावर गंभीर आरोप करत छत्रपती शिवाजी महाराजांचा कथित अवमान केल्याचा दावा केला आहे. दीपके यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका फोटोवरून राणे यांनी आक्षेप घेतला असून, या प्रकाराबद्दल त्यांनी माफी मागावी, अशी मागणी केली आहे. नितेश राणे यांच्या म्हणण्यानुसार, सोशल मीडियावर शेअर करण्यात आलेल्या एका पोस्टमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या खाली मावळ्यांच्या जागी कॉकरोच दाखवण्यात आले आहेत. हा प्रकार शिवाजी महाराजांचा अवमान करणारा असल्याचा आरोप राणे यांनी केला.

महाराष्ट्रातील शिवप्रेमी आणि देशभक्त हा कथित अपमान सहन करणार नाहीत, असेही त्यांनी म्हटले. राणे यांनी आणखी एका फोटोचा संदर्भ देत त्यावरही आक्षेप घेतला. या फोटोमध्ये महात्मा गांधी यांच्या पायाजवळ 'शिवाजी पार्क' असा उल्लेख करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव अशा पद्धतीने वापरणे योग्य नसल्याचे सांगत राणे यांनी दीपके यांनी या संपूर्ण प्रकाराबद्दल माफी मागावी, अशी मागणी केली.

ज्ञानेश कुमार देशाचे गद्दार : अभिजीत दिपके

त्यांच्यावर थेट फौजदारी गुन्हे दाखल करा : २ ऑक्टोबरला देशव्यापी एल्गार, 3 महिने जेलमध्ये टाकलं तरी रस्त्यावर उतरणार

■ मुंबई (दै. संध्या)



"केंद्रीय निवडणूक आयोग ही लोकशाहीची स्वायत्त संस्था न राहता नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या हातातील बाहुले बनली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे 'देशाचे गद्दार' असून त्यांनी पदावर राहण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे. त्यांचा तत्काळ राजीनामा घेण्यात यावा आणि त्यांच्यावर थेट फौजदारी गुन्हे दाखल करावेत," असा आरोप कॉकरोच जनता पार्टीचे (CJP) प्रमुख अभिजीत दिपके यांनी केला आहे. मुंबईत घेतलेल्या आक्रमक पत्रकार परिषदेत त्यांनी उद्या, 2 ऑक्टोबर (गांधी जयंती) रोजी दादरच्या शिवाजी पार्क येथून देशव्यापी आंदोलनाची हाक दिली. "आंदोलन केल्यास तीन दिवसांनंतरच जामीन मिळेल, अशी धमकी मुख्यमंत्री देत आहेत; पण सरकारने आम्हाला तीन दिवस काय, तीन महिने जरी तुरुंगात डांबले तरी बाहेर येऊन पुन्हा पुन्हा रस्त्यावर उतरू," असा थेट इशाराही दिपके यांनी राज्यकर्त्यांना दिला. पत्रकार परिषदेत पक्षाचे राष्ट्रीय संघटक अजिंक्य शिंदे, राष्ट्रीय प्रवक्त्या मेहेर, राष्ट्रीय सचिव आफरीन आणि मुंबई समन्वयक प्रणय यांच्या उपस्थितीत आंदोलनाचा कृती आराखडा जाहीर करण्यात आला. उद्या 2 ऑक्टोबर रोजी संध्याकाळी 4 वाजता दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क), गेट क्रमांक 6 येथून या आंदोलनाची सुरुवात होणार आहे. आंदोलकांनी राष्ट्रध्वज आणि गांधीजींचे टी-शर्ट परिधान करून शांततापूर्ण मार्गाने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुंबईनंतर गोवा, बंगळुरू (कर्नाटक), कोलकाता (पश्चिम बंगाल), पाटणा (बिहार), उत्तर प्रदेश आणि रांची (झारखंड) या सहा राज्यांत आंदोलनाची धग पोहोचवली जाईल. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस नवी दिल्लीतील जंतरमंतरवर देशभरातील तरुणांसह बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू करण्यात येईल आणि जोपर्यंत ज्ञानेश कुमार पायउतार होत नाहीत, तोपर्यंत तिथून हटणार नाही, असा निर्धार दिपके यांनी व्यक्त केला.

निवडणूक प्रक्रियेतील त्रुटींवर ताशेरे ओढताना अभिजीत दिपके म्हणाले, "लोकशाहीत जनतेने आपले सरकार निवडायचे असते; परंतु आज आपल्या देशात सरकार स्वतः ठरवत आहे की मतदार कोण असणार! हा लोकांच्या मताधिकारावर थेट दरोडा आहे. जर या पद्धतीने फेरफार करून निवडणुका घेतल्या गेल्या, तर सत्ताधारी उद्या अमेरिकेची निवडणूकही जिंकू शकतील, इतकी ही व्यवस्था भ्रष्ट करण्यात आली आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या विरोधात जसा जनक्षोभ उसळला होता, तसाच आता ज्ञानेश कुमारांविरोधात संपूर्ण देश रस्त्यावर उतरेल."

ठाण्याचे बीड झालंय : संजय राऊत

या लेडी डॉनला कोण वाचवतंय? : माजी महापौर मीनाक्षी शिंदेंची कथित वादग्रस्त ऑडिओ क्लिप ट्वीट

■ मुंबई (दै. संध्या)



ठाण्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या निर्घृण हत्याकांडाने राज्याच्या राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडवून दिली आहे. उद्धव ठाकरे यांनी प्रत्यक्ष पूर्णेकर कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केल्यानंतर ठाकरे गटाचे शिवसैनिक अत्यंत आक्रमक झाले असतानाच, आता खासदार संजय राऊत यांनी शिवसेना (शिंदे गट) नेत्या तथा ठाण्याच्या माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांची एक जुनी, अत्यंत वादग्रस्त ऑडिओ क्लिप समाजमाध्यमांवर पोस्ट करून राजकीय बॉम्ब टाकला आहे. "ठाण्याचे आता 'बीड' झाले असून घरात गुंड घुसवून संपवण्याची भाषा करणाऱ्या या लेडी डॉनला नेमके कोण वाचवत आहे?" असा थेट सवाल संजय राऊत यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना टॅग करत विचारला आहे. ठाणे महापालिका निवडणुकीच्या काळातील मीनाक्षी शिंदे यांची कथित जुनी ऑडिओ क्लिप पुन्हा एकदा चर्चेत आणत संजय राऊतांनी सत्ताधाऱ्यांवर चौफेर हल्ला चढवला आहे. व्हायरल ऑडिओ क्लिपमध्ये समोरच्या व्यक्तीशी बोलताना अत्यंत आक्षेपार्ह आणि अश्लील भाषेचा वापर करण्यात आला आहे. "माझ्या नवऱ्याने यांच्या बायका पळवून नेल्या का?" असा संताप व्यक्त करत, घरात माणसे घुसवून मारण्याची आणि ठाण्याच्या पोलीस आयुक्तांना सांगून एकेकाची वाट लावण्याची भाषा केली गेल्याचा दावा केला जात आहे. प्रदीप पूर्णेकर यांच्यावर गोळ्या झाडून त्यांची हत्या केल्यानंतर ठाणे गुन्हे शाखा आणि कापूरबावडी पोलिसांनी तपास वेगाने सुरू केला आहे. गुन्हे शाखेने मिरा रोड परिसरातून तीन महिला आणि दोन पुरुषांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. प्राथमिक माहितीनुसार, गुन्हा घडण्यापूर्वी हे सर्वजण मुख्य आरोपी पप्पा शिंदे याच्या सतत संपर्कात होते. हल्लेखोरांनी ज्या दोन मोटारसायकलवरून येऊन हा गोळीबार केला होता, त्या दोन्ही दुचाकी कापूरबावडी पोलिसांनी शोधून काढल्या असून त्या जप्त करून पोलीस ठाण्यात आणल्या आहेत.

संपादकीय

एस आय आर चा खेळखंडोबा

मतदार यादीच्या सुधारणेच्या नावाखाली सर्वसामान्य नागरिकांचा मताधिकार हिरावून घेण्याच्या या घातक प्रवृत्तीमुळे लोकशाही वरील उरला सुरला विश्वास उडून जाईल. मतदार यादीतून नाव वगळलेले सर्वच लोक मतदार असल्याचे पुरावे सादर करणार नाहीत. देशात लोकशाहीचा उत्सव साजरा करत असताना मतदानाचा अधिकार हा प्रत्येक नागरिकाचे सर्वात मोठे हत्यार मानले जाते. मात्र यात अधिकाऱ्याची पायमल्ली करत निवडणूक आयोगाने सध्या चालवलेल्या मतदार यादीचा पुनर्विलोकन एस आय आर या प्रक्रियेच्या सावळा गोंधळ अत्यंत संतापजनक आणि हास्यास्पद आहे. ज्या मोहिमेचा हेतू पारदर्शकता आणणे असा असायला हवा होता. त्याच मोहिमेने संपूर्ण निवडणूक यंत्रणेतील फोलपणा उघडा पाडला आहे. घाई गर्दीत कोणतीही पूर्वतयारी न करता राबवल्या जाणाऱ्या एस आयआर प्रक्रियेमुळे बड्या हस्ती पासून ते अगदी सर्वसामान्य मतदारा पर्यंत प्रत्येकाला नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. या प्रक्रियेचा उथळपणा तेव्हाच स्पष्ट झाला जेव्हा या देशाचे माजी उपपंतप्रधान लालकृष्ण आडवाणी यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याला नोटीस बजावण्यात आली. आडवाणीजी हे दिल्लीत गेल्या अनेक दशकापासून एकाच पत्त्यावर राहत आहेत. तरीही आडवाणी त्यांची मुलगी प्रतिभा आणि सूनबाई यांच्या नावे विसंगतीची नोटीस निघते. मात्र त्याच घरात राहणाऱ्या त्यांच्या मुलाचे नाव पडताळणीत असते. यापेक्षा मोठा विनोद तो काय असू शकतो. एवढ्यावरच हे थांबले नाही तर विद्यमान परराष्ट्रमंत्री जय शंकर आणि त्यांच्या पत्नी. सीबीआय संचालक प्रवीण सूद. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता. अरविंद केजरीवाल. मनीष सिसोदिया.कपिल सिब्बल. यासारख्या मातब्बर आणि अति महत्त्वाच्या व्यक्तींना या विसंगतीच्या नोटिसा निघालेल्या आहेत.ज्या देशात मोठमोठ्या बड्या व्यक्तींच्या नोंदी सुरक्षित नाहीत. तिथे सर्वसामान्य नागरिकांची काय कथा असणार?...या साऱ्या ढिसाळ कारभारामागे प्रशासकीय अनास्था आणि सत्ताधाऱ्यांचा वाढता हस्तक्षेप स्पष्टपणे दिसून येतो. प्रत्यक्षात ज्या कर्मचारी मंडळीवर ही जबाबदारी सोपवली आहे ते अत्यंत अनिश्चेने आणि दबावाखाली घरोघरी न जाताच ए. सी मध्ये बसून काम करताना आणि ते उरकताना दिसत आहेत. नियमानुसार कर्मचाऱ्यांनी घरोघरी फिरून प्रत्यक्ष आढावा घेणे अपेक्षित असताना अनेक ठिकाणी सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधीनी आपापल्या कार्यालयातून एस आय आर चे काम चालवण्यात धन्यता मानलेली आहे. हे सर्वश्रुतच झाले आहे.यामुळे या प्रक्रिया भोवती संशयाचे दाट जाळे निर्माण झाले आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे पश्चिम बंगाल आणि अन्य राज्यामध्ये निवडणूकी पूर्वी लाखो मतदारांची नावे परस्पर वगळण्यात आली.कोणतीही पूर्व सूचना न देता ही नावे राजरोसपणे वगळण्यात आलेली आहेत. आम्ही वर्षानुवर्षे एकाच घरात राहतोय आणि एकाच केंद्रावर मतदान करतोय असे ओरडून सांगूनही अधिकाऱ्यानी या सर्वसामान्य नागरिकांचे म्हणणे ऐकून घेतले नाही. त्यामुळे विरोधी किंवा विशिष्ट घटकातील मतदारांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवणे हा तर प्रक्रिया मागील छुपा हेतू नाही ना?.... हा विरोधकांचा दावा पूर्णपणे निराधार वाटत नाही असे वाटायला लागले आहे. लोकशाहीचा गळा घोटणारा हा प्रशासकीय घोळ लवकरात लवकर थांबूवून निवडणूक आयोगाने आपली पत सावरण्याची गरज आहे अन्यथा मतदार यादीच्या नावाखाली नागरिकांना मतदानाचा हक्क हिरावून घेण्याच्या या प्रवृत्तीमुळे लोकशाही वरील उरला सुरला विश्वास आहे तो उडून जाईल. मतदार यादीतून नाव वगळलेले किंवा नोटीस दिलेले सर्वच लोक आपण मतदाराचे पदर पुरावे सादर करणार नाहीत हे खाजीने सांगतो. याचा परिणाम म्हणून काही लाख किंवा हजारो मतदार मतदानाच्या प्रक्रियेतून बाहेर फेकले जातील. तसेच आपल्याकडे मतदानाचा उत्साह दांडगा असतो शहरी भागात ५० टक्के मतदान झाले म्हणजे चांगले मतदान झाले असे समजले जाते. ४०टक्के मतदार मतदानाचे दिवशी मतदान केंद्रावर फिरकत सुद्धा नाही. सलग सुट्ट्याचा लाभ घेऊन पर्यटन स्थळी फिरायला जातात. त्यामुळे एस आय आर मुळे जर मोठ्या प्रमाणावर मतदानाची नावे वगळली तर मतदारांची संख्या कमी होईल. त्यातील निम्मे मतदानाला बाहेर पडले तर लोकसंख्येच्या तुलनेच्या अत्यल्प मतदानाच्या आधारे उमेदवार नगरसेवक आमदार खासदार होऊन जातील. हे लोकशाही करता पोषक ठरणार नाही. मतदार यादीतून नाव वगळलेल्या वंचित मतदारांच्या तक्रारीची दखल घ्यायला हवी. एस आय आर मोहीम प्रामाणिकपणे राबवणे गरजेचे आहे. तरच सर्वसामान्य मतदारांचा निवडणूक आयोगावर व त्यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास बसेल अन्यथा अविश्वासाच्या वातावरणात या पुढील निवडणुका झाल्या तर सर्वसामान्यांचा लोकशाही वरील व संहितेवरील विश्वासाला तडा जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

युवा मोर्चाच्या वतीने जेजुरीत मेळावा

■ जेजुरी (दै. संध्या)

भारतीय जनता युवा मोर्चा, पुणे जिल्हा ग्रामीण यांच्या वतीने पुणे जिल्ह्यातील युवा कार्यकर्ते, पदाधिकारी व युवकांना संघटनात्मकदृष्ट्या एकत्रित आणण्यासाठी 'युवा निर्धार मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता, मल्हार नाट्यगृह जेजुरी येथे होणार आहे. या 'युवा निर्धार मेळाव्यास' मा. मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, भाजप प्रदेश उपाध्यक्ष आमदारगोपीचंद पडळकर, आमदार राहुल कुल, योगेश टिळेकर, माजी आमदारसंजय जगताप, भाजपाचे पुणे जिल्हाध्यक्ष शेखर वढणे, सरचिटणीस,भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस राजेश पांडे,कृष्णराज महाडीक युवा मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष कृष्णराज महाडिक आदी पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याचे भाजप युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष वैभव सोलनकर यांनी दिली.

शेरेवाडीत दोन महिलांची हत्या

युगेंद्र पवारांनी नातेवाईकांची घेतली भेट



■ बारामती (दै. संध्या)

तालुक्यातील शेरेवाडी येथे मध्यरात्री दोन महिलांची हत्या झाल्याची घटना घडली.त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार यांनी शेरेवाडी येथे जाऊन मृत महिलांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी नातेवाईकांशी संवाद साधून घटनेची माहिती जाणून घेतली. यावेळी तपास अधिकारी देखील उपस्थित होते. त्यांनी सुरू असलेल्या तपासाबाबत माहिती दिली. दरम्यान,या घटनेचा सखोल तपास करून हत्येमागील कारणांचा उलगडा करावा आणि संबंधित आरोपींचा शोध घेऊन कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी युगेंद्र पवार यांनी केली.घटनेचा पुढील तपास बारामती पोलिसांकडून सुरू आहे.

समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये आविष्कार २०२६ संपन्न

सहा विषयशाखांमध्ये ४७ विद्यार्थ्यांचा सहभाग; १२ विद्यार्थ्यांची विभागीय फेरीसाठी निवड, विविध संशोधन संकल्पना, प्रकल्प आणि नाविन्यपूर्ण कल्पना प्रभावीपणे सादर

■ जुन्नर (दै. संध्या)



समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे येथे 'आविष्कार २०२६' अंतर्गत संस्थास्तरीय फेरी उत्साहपूर्ण व शैक्षणिक वातावरणात संपन्न झाली. विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती, नवकल्पना, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या स्पर्धेत सहा विविध विषयशाखांमध्ये एकूण ४७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचा शुभारंभ सरस्वती पूजनाने झाला. समर्थ शैक्षणिक संकुलाचे कॅम्पस संचालक प्रा. राजीव सावंत यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी संशोधन व नवोपक्रमाकडे केवळ स्पर्धेच्या दृष्टिकोनातून न पाहता समाजोपयोगी आणि नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रत्यक्ष रूप देण्याचा प्रयत्न करावा, असे मार्गदर्शन केले.

स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध संशोधन संकल्पना, प्रकल्प आणि नाविन्यपूर्ण कल्पना परीक्षकांसमोर प्रभावीपणे सादर केल्या. प्रकल्पांचे मूल्यमापन नाविन्यता, संशोधनाची उपयुक्तता, वैज्ञानिक दृष्टिकोन, सादरीकरण कौशल्य आणि भविष्यातील उपयोगिता या निकषांच्या आधारे करण्यात आले.

विभागीय फेरीसाठी १२ विद्यार्थ्यांची निवड मानवविद्या, भाषा व ललित कला- ऋतुजा बोंबे, सिद्धी तांबे,वाणिज्य, व्यवस्थापन व विधी-वैष्णवी मोरे, प्रणाली गंधकते. शुद्ध विज्ञान-लितेज शिरतर, कल्याणी घोगरे. कृषी व पशुसंवर्धन-ईश्वरी राऊत,सानिया जमादार. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान-आदितीऔटी, नेहा मिडगुले. वैद्यक व औषधनिर्माणशास्त्र-ऋषिकेश सोमवंशी रोहित नवाळी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. कुलदीप रामटेके यांनी आगामी विभागीय फेरीची माहिती दिली. दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे येथे 'आविष्कार २०२६'ची विभागीय फेरी आयोजित करण्यात आली असून, निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी अधिक आत्मविश्वासाने आणि परिपूर्ण तयारीने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके आणि प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर, डी.फार्मसी विभागप्रमुख डॉ. शीतल गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून आगामी विभागीय फेरीसाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धेचे आयोजन समन्वयक प्रा. शुभम गडगे आणि डॉ. शीतल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विविध प्रकल्पांचे मूल्यमापन डॉ. सचिन दातखिळे, डॉ. सागर तांबे, डॉ. शुभांगी हाडवळे, प्रा. काजल वाळुंज आणि प्रा. श्रद्धा खळदकर यांनी केले. या प्रसंगी विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



तरुणींनी शारीरिक व मानसिक आरोग्याला प्राधान्य द्यावे : प्रिया बिरादार

■ शिरूर (दै. संध्या)

बदलत्या जीवनशैलीच्या काळात तरुणाईने शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्याकडेही गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेशी झोप, सकारात्मक विचार आणि व्यसनांपासून दूर राहणे हा निरोगी जीवनाचा मूलमंत्र आहे, असे प्रतिपादन वुमन्स सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा ओन्ली वुमन्स जिमच्या संचालिका प्रिया बिरादार यांनी केले.

चांदमल बोरा महाविद्यालयांतर्गत विद्यार्थिनी मंच व महिला लैंगिक अत्याचार निवारण समितीच्या वतीने 'सुदृढ तन, निरोगी मन—तरुणाईच्या आरोग्याचा मंत्र' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रिया बिरादार विद्यार्थिनींशी संवाद साधताना बोलत होत्या.

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे तरुणांमध्ये ताणतणाव, अपुरी झोप, व्यायामाचा अभाव तसेच चुकीच्या आहाराच्या सवयी वाढत आहेत. याचा थेट परिणाम शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होत असल्याने विद्यार्थिनींनी आपल्या दैनंदिन जीवनात व्यायामाला महत्त्व द्यावे, पौष्टिक आहार घ्यावा आणि स्वतःच्या आरोग्याची नियमित काळजी घ्यावी, असे प्रिया बिरादार यांनी सांगितले. निरोगी शरीर आणि प्रसन्न मन हे यशस्वी जीवनाची भक्कम पायाभरणी आहे, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चांदमल बोरा महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. के. सी. मोहिते होते. यावेळी उपप्राचार्य प्रा. जाधव, प्रा. राजश्री नवले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. रेणुका गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. यशस्विता वारे यांनी केले, तर आभार प्रा. क्रांती पैठणकर यांनी मानले. यावेळी वुमन्स सोशल फाउंडेशनच्या सुजाता पाटील, नीलमधु शर्मा, भारती शहाणे, सृष्टी करंजुले, विजयालक्ष्मी उपाध्याय, जयश्री थिटे यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्याख्यानातून विद्यार्थिनींना आरोग्य, व्यायाम, मानसिक स्वास्थ्य आणि सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन मिळाले.

शालेय विद्यार्थ्यांचा सेंद्रिय शेतीचा अनोखा उपक्रम

■ नारायणगाव(दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील वडगाव आनंद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी एक स्तुत्य उपक्रम राबवला आहे. शालेय विद्यार्थ्यांना शेती, सेंद्रिय शेती आणि पर्यावरण संवर्धनाचे प्रत्यक्ष ज्ञान व अनुभव मिळावा या उद्देशाने शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या सहभागातून शाळा परिसरात एक सुंदर परसबाग विकसित केली आहे. सध्या ही परसबाग हिरवाईने नटली असून पूर्ण जोमात आली आहे, ज्यामुळे शाळेचा संपूर्ण परिसर अत्यंत प्रसन्न आणि सुंदर दिसत आहे.

या परसबागेमध्ये सध्या विशेषत्वाने आल्याची लागवड करण्यात आली आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना आल्याच्या लागवडीचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला होता. या उपक्रमासाठी माननीय किसन महादू चौगुले यांनी शाळेला आल्याचे बियाणे मोफत उपलब्ध करून दिले. तसेच या पिकासाठी आवश्यक असणारे सेंद्रिय खत अविनाश आढाव यांनी पुरवले आहे. या दोन्ही मान्यवरांच्या मोलाच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना सेंद्रिय पद्धतीने पीक घेण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला.

परसबागेच्या उत्तम व्यवस्थापनासाठी शाळेचे व्यवस्थापन समिती सदस्य प्रदीप गडगे व इतर महिला भगिनींनी वेळोवेळी मदत आणि मार्गदर्शन केले. त्यांच्या या सहभागामुळे परसबागेतील आल्याच्या पिकाची योग्य पद्धतीने निगा राखली जात आहे.या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता, प्रत्यक्ष शेतीमधील विविध प्रक्रिया अनुभवण्याची मोठी संधी मिळाली आहे.

बियाण्यांची निवड करणे, जमीन तयार करणे, लागवड, सेंद्रिय खतांचा वापर, पिकाची योग्य निगा राखणे आणि उत्पादनापर्यंतच्या सर्व प्रक्रियांचे प्रत्यक्ष ज्ञान विद्यार्थ्यांना या माध्यमातून मिळत आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी डी. बी. नाना वाळूंज आणि शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय चौगुले पाटील यांनी विशेष प्रयत्न केले.

तसेच शाळेचे मुख्याध्यापक सुनील ठिकेकर, सहशिक्षिका छाया डुंबरे,सविता खेत्री,गीता बोऱ्हाडे व सुनंदा तांबे यांनी या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य व परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

राजे नागरी सहकारी पतसंस्था सामाजिक उपक्रमात अग्रेसर

■ नारायणगाव (दै. संध्या)

वारुळवाडी येथील राजे नागरी सहकारी पतसंस्थेची तिसरी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साही वातावरणात संपन्न झाली. या संस्थेला सण 2025 - 26 या आर्थिक वर्षात ऑडिट वर्ग 'ब' प्राप्त झालेला असून पुढच्या आर्थिक वर्षात संस्था नक्की नफ्यात जाईल आणि ऑडिट वर्ग 'अ' मिळेल असा विश्वास उपस्थित सर्व हितचिंतकांनी व्यक्त केला.

सिल्वर पार्क, वारूळवाडी येथील सभागृहात या संस्थेची तिसरी सर्वसाधारण सभा पार पडली. विषय पत्रिकेवरील 1 ते 12 विषयांवर खेळीमेळीच्या वातावरणात सर्व संचालक आणि सभासदांमध्ये चर्चा झाली. जुन्नर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्ते सुरज वाजगे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

नारायणगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे यांनी उपस्थित सर्व सभासद आणि संचालकांना मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाकरवाडी येथील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेच्या वतीने शालेय साहित्य देऊन करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणामध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जुबेर शेख यांनी राजे नागरी सहकारी संस्थेने आतापर्यंत केलेल्या वेगवेगळ्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उपक्रमाबाबत उपस्थितांना माहिती दिली. राजे ग्रुप महाराष्ट्र राज्य आणि राजे नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये संचालक असलेले सर्व सभासद हे तरुण असून या सर्व तरुणांनी एकत्र येऊन सामाजिक कार्य करण्यासाठी राजे नागरी संस्थेच्या नावाने उत्तम योगदान दिलेले आहे.



वडगाव आनंद येथे रामदासबाबा पालखीच्या स्वागताने शाळेत आनंदोत्सव

■ नारायणगाव (दै. संध्या)

वडगाव आनंद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत रामदासबाबा यांच्या पालखीचे अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात स्वागत करण्यात आले. पालखीचे शाळेत आगमन झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध भक्तीगीते सादर करत रामदास बाबांच्या पालखीला मानवंदना दिली. या सोहळ्यामुळे संपूर्ण शालेय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने आणि शैक्षणिक क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्याच्या हेतूने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पालखी सोहळ्याचे औचित्य साधून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना समोसा आणि मोतीचूर लाडूची स्वादिष्ट मेजवानी देण्यात आली. या मेजवानीचा विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे आणि आनंदाने आस्वाद घेतला.

उपस्थित ग्रामस्थांनी देखील विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे भरभरून कौतुक केले आणि त्यांना बक्षीस रक्कम देऊन त्यांचा उत्साह वाढवला. हा संपूर्ण उपक्रम शिक्षकांच्या पुढाकाराने आणि शालेय व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पडला.

याप्रसंगी डी. बी. वाळूंज, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय चौगुले, मुख्याध्यापक सुनील ठिकेकर, शालेय शेतकरी मित्र प्रदीप गडगे, सहशिक्षिका छाया डुंबरे, सविता खेत्री, विनोद रांजणकर, गीतांजली वाळुंज, माजी विद्यार्थी संदीप भालके, अविनाश आढाव आणि सुनंदा तांबे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी सत्यनारायण महापूजेचे देखील आयोजन करण्यात आले होते.

शाळेच्या परसबागेत राबवलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांबद्दल सर्वांनी समाधान व्यक्त केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनीता काशीकेदार व सविता काशीकेदार यांनी विशेष सहकार्य केले.



RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



वीजबिल भरताच अभिनेत्री तनिषा मुखर्जी यांच्या फार्महाऊसचा वीजपुरवठा पूर्ववत

पुणे : दैनिक संध्या

थकीत वीजबिलामुळे अभिनेत्री तनिषा मुखर्जी यांच्या लोणावळा येथील फार्महाऊसचा २६ सप्टेंबर रोजी खंडित करण्यात आलेला वीजपुरवठा बुधवारी (दि. ३०) वीजबिल भरल्यानंतर महावितरणकडून तातडीने पूर्ववत करण्यात आला. लोणावळा येथील फार्महाऊससाठी अभिनेत्री तनिषा मुखर्जी यांच्या नावावर महावितरणची तीन फेजची वीजजोडणी आहे. मोठ्या परिसरात असलेल्या या फार्महाऊसचे वीजमीटर प्रवेशद्वारापासून सुमारे ३०० फूट अंतरावर आहे. प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक तैनात असल्याने मीटर रीडिंगसाठी तेथील व्यवस्थापकाची (केअरटेकर) परवानगी घ्यावी लागते. श्रीमती मुखर्जी यांनी जुलै २०२६ चे वीजबिल ५ ऑगस्ट रोजी भरले होते. जुलैनंतर ऑगस्ट व सप्टेंबर अशा दोन महिन्यांची देयके तयार झाली. ऑगस्ट महिन्याची वीजबिल भरण्याची मुदत ४ सप्टेंबर रोजी संपली. त्यानंतर नियमानुसार श्रीमती मुखर्जी यांचे नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर वीजबिलाची नोटीस SMS द्वारे देण्यात आली. १९ सप्टेंबर रोजी नोटीशीची मुदत संपल्यानंतरही तेथील व्यवस्थापकास वीजबिल भरण्याची विनंती स्थानिक वीज कर्मचाऱ्यांनी वारंवार केली. तरीही वीजबिल न भरल्याने शेवटी महावितरणने नियमानुसार २६ सप्टेंबर रोजी वीजपुरवठा खंडित केला. बुधवारी (दि. ३०) दुपारी मुखर्जी यांनी ऑनलाईनच्या माध्यमातून ३००० हजार रुपये देयक भरले. त्यानंतर महावितरणने तातडीने वीजपुरवठा पूर्ववत केला. वीजबिल थकीत राहिल्यास नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई केली जाते. तसेच थकित बिलाचा भरणा झाल्यानंतर वीजपुरवठा पूर्ववत केला जातो. या प्रकरणातही महावितरणने नियमानुसार कारवाई करून वीजबिलाचा भरणा होताच वीजपुरवठा पूर्ववत केला आहे.



विस्डम इन मोशन फोरमच्या संकेत स्थळाचे सामाजिक न्याय मंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

पुणे : दैनिक संध्या

विस्डम इन मोशन फोरम आणि कॅटलिस्ट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषद- पुणे २०२६' या कार्यक्रमाचे आयोजन १७ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. या परिषदेबाबत माहिती देणाऱ्या www.thewisdominmotion.org या अधिकृत संकेतस्थळाचे लोकार्पण राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते करण्यात आले. बौद्ध महिला परिषदेच्या आयोजन समितीच्या धम्मदर्शना भिक्कुनी - भीमटेक, डॉ. उज्ज्वला आंदुरकर (प्रसिद्ध भूलतज्ज्ञ), डॉ. संध्या हरिभक्त (बालरोगतज्ज्ञ), डॉ. वैशाली भामरे, ॲड प्रियांका खंडाळे, तसेच लक्ष्मीकांता माने (पाली व बौद्ध अध्ययनाच्या अभ्यासक) यांनी याबाबत माहिती दिली. विविध देशातील सहभागी वक्ते, नोंदणी प्रक्रिया, परिषद आयोजित करण्यापाठीमागे उद्देश याबाबतची माहिती या संकेत स्थळावर देण्यात आली आहे. व्हिएतनाम, श्रीलंका, कोरिया, ऑस्ट्रेलिया आणि भारतातील नामांकित भिक्खुनी तसेच विविध क्षेत्रांतील गाढे अभ्यासक या परिषदेत वक्ते आणि चर्चासत्रातील सदस्य म्हणून सहभागी होणार आहेत. बौद्ध धम्माचा तसेच भगवान बुद्धांच्या विचारांचा जागतिक स्तरावर प्रचार- प्रसार, तसेच विविध देशांतील बौद्ध अभ्यासक, भिक्खू, संशोधक आणि अनुयायांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय बौद्ध परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे. भारत आणि परदेशातील बौद्ध भिक्खू-भिक्खूणी, अभ्यासक, शिक्षणतज्ज्ञ, व्यावसायिक, कलाकार, सामाजिक नेते आणि धम्म-साधक एका व्यासपीठावर एकत्र येणार आहेत. विद्यार्थी, संशोधक, नोकरदार, व्यावसायिक, गृहिणी किंवा धम्माचे जिज्ञासू तसेच अभ्यासकांना शिकण्याची, अभ्यासाची आणि प्रेरणा मिळवण्याची संधी उपलब्ध होणार आहे. परिषदेसाठी उपस्थित राहू इच्छिणाऱ्या देश-विदेशातील नागरिक आणि बौद्ध अनुयायांना संकेतस्थळामुळे परिषदेसंदर्भातील माहिती सहज उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. परिषदेसाठी धम्मदान देण्याची सुविधाही या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. याबाबत अधिक माहितीसाठी ७८८८१२९१६९ आणि ८९७५७३८६३३ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

श्राद्धविधीत कावळ्याच्या 'स्पर्शा'ची प्रतीक्षा

कोंढवा: दैनिक संध्या

पितृपंधरवड्याला सुरुवात होताच शहरासह ग्रामीण भागात पूर्वजांच्या स्मरणार्थ श्राद्धविधी, तर्पण आणि पिंडदान करण्याची लगबग सुरू झाली आहे. हिंदू धार्मिक परंपरेनुसार पितरांचे स्मरण करून त्यांच्या आत्मशांतीसाठी विविध धार्मिक विधी केले जातात. या विधींमध्ये कावळ्याला विशेष महत्त्व असल्याने श्राद्धाच्या दिवशी कावळ्याने पिंडाला शिवावे, यासाठी भटजींकडून मंत्रोच्चारासह नातेवाईक कावळ्याला विनवणी करतानाचे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. पितृपंधरवडा हा आपल्या पूर्वजांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा कालावधी मानला जातो. कुटुंबातील दिवंगत व्यक्तीच्या तिथीनुसार श्राद्ध केले जाते. सकाळपासूनच घरांमध्ये स्वच्छता करून स्वयंपाकाची तयारी केली जाते. पारंपरिक पद्धतीने विविध पदार्थ तयार करून पिंडदान, तर्पण, ब्राह्मण भोजन आदी विधी केले जातात. श्राद्धविधीमध्ये कावळ्याला अन्नाचा नैवेद्य दाखविण्याची प्रथा आहे. लोकपरंपरेत कावळ्याला पितरांचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे कावळा येऊन नैवेद्याला स्पर्श करेपर्यंत कुटुंबीय प्रतीक्षा करतात. अनेकदा कावळा परिसरात असूनही पिंडाजवळ येत नसल्याने भटजींकडून मंत्रोच्चार करीत त्याला बोलावले जाते. कावळ्याने पिंडाला स्पर्श केल्यानंतर श्राद्धविधी पूर्ण झाल्याचे समाधान कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर दिसून येते. पितृपंधरवडा हा केवळ धार्मिक विधींचा कालावधी नसून कुटुंबातील दिवंगत व्यक्तींच्या आठवणींना उजाळा देणारा काळ म्हणूनही पाहिला जातो. अनेक कुटुंबांमध्ये या दिवशी पूर्वजांच्या आठवणी सांगितल्या जातात. त्यांच्या आवडीचे पदार्थ तयार केले जातात. ज्येष्ठ व्यक्तींकडून पूर्वजांच्या आठवणी आणि कुटुंबाचा इतिहास पुढील पिढीला सांगितला जातो. श्राद्धाच्या वेळी कावळा पिंडाला शिवणे शुभ मानण्याची परंपरा महाराष्ट्रासह देशातील विविध भागांत आढळते. मात्र, कावळा हा पितरांचा (आत्म्याचा) प्रत्यक्ष प्रतिनिधी आहे, असे पूर्वीपासून मानले जाते. कावळ्याला दिले जाणारे महत्त्व हे प्रामुख्याने धार्मिक श्रद्धा, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक प्रतीकात्मकतेशी संबंधित आहे. दरम्यान, बदलत्या जीवनशैलीमुळे अनेक कुटुंबांमध्ये पारंपरिक श्राद्धविधी करण्याच्या पद्धतींमध्ये बदल होत असला, तरी पूर्वजांचे स्मरण आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची भावना आजही कायम असल्याचे चित्र आहे.

महात्मा गांधी सप्ताहाचे १ ते ७ ऑक्टोबर दरम्यान आयोजन

■ पुणे (दै. संध्या)



राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांचा आणि कार्याचा नव्या पिढीला परिचय व्हावा, तसेच त्यांच्या विचारांचे स्मरण व्हावे, यासाठी महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दल यांच्या संयुक्त विद्यमाने गांधी भवन, कोथरूड, पुणे येथे दि. १ ते ७ ऑक्टोबर २०२६ दरम्यान महात्मा गांधी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेचे दिवंगत अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांनी सुरु केलेल्या या उपक्रमाचे यंदाचे १५वे वर्ष आहे. या सप्ताहात विविध प्रबोधनात्मक, वैचारिक, मनोरंजनात्मक आणि माहितीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव कदम यांनी पत्रकार परिषदेत दिली. या प्रसंगी विश्वस्त रमेश आढाव, लक्ष्मीकांत देशमुख, युक्रांद पुणे शहरचे संघटक तेजस भालेराव, विश्वस्त सचिव अन्वर राजन उपस्थित होते.

या सप्ताहात पर्यावरण, सामाजिक चळवळी, लोकशाहीसमोरील आव्हाने, चित्रपट व चर्चा, गांधी विचार आणि काव्य अशा विविध विषयांवरील व्याख्याने व कार्यक्रम होणार आहेत. ज्येष्ठ लेखक व पत्रकार अंबरिश मिश्र, कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके, तुषार गांधी, विवेक सावंत, सुषमा अंधारे, माधव भंडारी, विकास लवांडे, प्रशांत जगताप, श्रावणी बुवा, अक्षय कांबळे, पर्यावरणतज्ञ अतुल देऊळगावकर, चित्रपट लेखक व दिग्दर्शक वरूण सुखराज, बँकिंगतज्ञ देविदास तुळजापुरकर हे विविध दिवशी सहभागी होत आहेत.

गांधी सप्ताहाचे उद्घाटन गुरुवार, दि. १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.०० वाजता ज्येष्ठ पत्रकार, लेखक व साहित्यिक अंबरिश मिश्र यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी सर्वधर्म प्रार्थना केली जाईल त्यानंतर 'एक थेंब गांधी' या विषयवार त्यांचे व्याख्यान होईल. अध्यक्षस्थानी डॉ. शिवाजीराव कदम राहणार आहेत.

या सप्ताहात शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर सकाळी ८.३० वाजता गांधी जयंती व जागतिक अहिंसा दिनानिमित्त गांधी भवन येथे प्रार्थना व भजनाचा कार्यक्रम ज्येष्ठ गायिका शुभांगी मुळे व सहकलाकार सादर करतील. सकाळी ९ वाजता डेक्कन येथील मक्केशाह मस्जिद आणि पांचाळेश्वर मंदिर ते गांधी भवन असा शांतता मार्च आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर सर्वांसाठी प्रसाद भोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार दि. ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांचे व्याख्यान 'आमचे आंदोलनातील अनुभव' या विषयावर होणार आहे. महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (MKCL) चे सल्लागार विवेक सावंत हे 'तरुणांपुधील आव्हाने' यांवर मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त लक्ष्मीकांत देशमुख भूषवतील.

रविवार दि. ४ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.०० वाजता जादूचे प्रयोग जादुगार संजय रघुवीर सादर करतील. या प्रसंगी प्रमुख पाहुणे राजीव तांबे असणार आहेत. तसेच सायंकाळी ५.३० वाजता लोकशाही समोरील आव्हाने या विषयावरील परिसंवादात सुषमा अंधारे, माधव भंडारी, विकास लवांडे, प्रशांत जगताप, श्रावणी बुवा, अक्षय कांबळे हे सहभागी होत आहेत.

सोमवार दि. ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता चित्रपट लेखक व दिग्दर्शक वरूण सुखराज आणि बँकिंगतज्ञ देविदास तुळजापुरकर हे 'द ग्रेट इंडियन इल्युजन डॉक्युमेंटरी' सादरीकरणावर संवाद करणार आहेत. अध्यक्षस्थानी 'सत्याग्रही' मासिकाचे संपादक अनंत बागाईतकर असतील.

मंगळवार दि. ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता पर्यावरणतज्ञ अतुल देऊळगावकर 'पोरके पर्यावरण' या विषयार व्याख्यान सादर करतील. अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त तुषार गांधी असतील.

बुधवार दि. ७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता समारोप समारंभात वैचारिक कवितांचा कार्यक्रम सादर होईल.

या सप्ताहाच्या निमित्ताने गांधी भवनच्या आवारात दि. १ ते ७ ऑक्टोबर दरम्यान दुपारी ३.०० वाजता आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजलेल्या नेत्यांचे चित्रपट (बायोपिक), प्रबोधन, मनोरंजन व माहितीपर वेगवेगळ्या कार्यक्रमांचे, चित्रपटांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सकाळी १०.०० ते रात्री ८.०० या वेळेत खादी, पुस्तके, हातमाग तसेच विविध गृहपयोगी वस्तूंचे स्टॉल्सही उपलब्ध असणार आहेत.



तासाला पाच हजार इडली तयार होणार

■ पुणे (दै. संध्या)

माध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत पुण्यातील २०० शाळांमधील ६० हजार विद्यार्थ्यांना पोषण आहार देणाऱ्या अन्नामृत फाउंडेशनच्या पिंपरी येथील स्वयंपाकघरात तासाला पाच हजार इडली तयार करणाऱ्या स्वयंचलित मशीनचे उद्घाटन करण्यात आले. या मशीनमुळे मोठ्या प्रमाणात इडली तयार करणे शक्य होणार असून, अन्नामृत फाउंडेशनच्या पोषण आहार उपक्रमात इडलीचा समावेश केला जाणार आहे.

कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, विधान परिषद सदस्य श्रीकांत भारतीय, आमदार अमित गोरखे, भाजपा राज्य सरचिटणीस राजेश पांडे, नगरसेविका सारिका मासुळकर आणि इस्कॉनच्या आंतरराष्ट्रीय नियामक मंडळाचे कमिशनर गौरांग प्रभू, अन्नामृत फाउंडेशनचे प्रवक्ते डॉ. जनार्दन चितोडे उपस्थित होते.

अन्नामृत फाउंडेशनचे प्रवक्ते डॉ. जनार्दन चितोडे म्हणाले, अन्नामृत फाउंडेशनतर्फे पुण्यातील २०० शाळांमधील ६० हजार विद्यार्थ्यांना माध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत पोषण आहार दिला जातो. या आहारामध्ये विविध प्रकारच्या डाळी, भात, पुलाव, तीळ चिक्की, नाचणी लाडू, शेंगदाणा लाडू आणि फळांचा समावेश केला जातो,

अन्नामृत फाउंडेशनचे संचालक संजय भोसले म्हणाले, स्वयंचलित इडली मशीनसाठी आर्थिक योगदान दिल्याबद्दल ओरिएंटल रबर कंपनीचे अन्नामृत फाउंडेशन आभारी आहे. बजाज मोटर्स, मुकुल माधव फाउंडेशन यांच्यासह अनेक कंपन्या सीएसआरच्या माध्यमातून पोषण आहाराच्या उपक्रमाला हातभार लावत आहेत. अन्नामृत फाउंडेशनच्या विविध उपक्रमांची माहितीही त्यांनी दिली. चंद्रकांत पाटील यांनी अन्नामृत फाउंडेशनच्या कार्याचा गौरव केला. भविष्यात शासनाकडून सहकार्य देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. गौरांग प्रभू यांनी कॅनडा येथे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी इस्कॉनच्या कार्यक्रमात सहभागी झाल्याची आठवण सांगितली. वाजपेयी हे इस्कॉन मंदिराला भेट देणारे पहिले भारतीय पंतप्रधान असल्याचे त्यांनी सांगितले.अन्नामृत फाउंडेशनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. संजय टिकू आणि विश्वस्त धीरज वर्मा यांनी देशभरात सुरू असलेल्या पोषण आहार उपक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जनार्दन चितोडे यांनी केले.

पुण्यातील कम्युनिटीज आणि त्यांच्या सर्जनशीलतेचा गौरव

■ पुणे(दै. संध्या)

आदित्य बिर्ला समूहाची प्रमुख कंपनी ग्रासिम इंडस्ट्रीज अंतर्गत येणाऱ्या बिर्ला ओपस पेंट्सने 'बाप्पाचा मान' या उपक्रमाच्या माध्यमातून पुण्यातील उत्सवी वातावरणाला एक नवा रंग दिला. या अनोख्या उपक्रमातून दरवर्षी बाप्पाच्या स्वागतासाठी सज्ज होणाऱ्या हाउसिंग सोसायट्यांची सर्जनशीलता, भक्ती आणि सामूहिक प्रयत्नांचा गौरव करण्यात आला. या उपक्रमाला शहरातील अनेक हाउसिंग सोसायट्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सहभागी सोसायट्यांनी आपल्या उत्सवाच्या जागांचे रूपांतर संस्कृती, सामुदायिक भावना आणि कलात्मक सर्जनशीलतेचे सुंदर दर्शन घडवणाऱ्या ठिकाणांमध्ये केले.

महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय सणांपैकी एक असलेल्या गणेश चतुर्थीच्या उत्सवी भावनेतून प्रेरित 'बाप्पाचा मान' या उपक्रमांतर्गत हाउसिंग सोसायट्यांना त्यांच्या मंडपाच्या पार्श्वभूमीवर 'गणेशाज ड्रीम होम' साकारण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. या उपक्रमासाठी पुण्यातून सुमारे 227 प्रवेशिका प्राप्त झाल्या. विविध कम्युनिटीजनी आपल्या कलात्मक सजावटी, अनोख्या संकल्पना आणि आकर्षक उत्सवी सजावटीच्या माध्यमातून आपली सर्जनशीलता सादर केली.

या सर्व प्रवेशिकांमधून पुण्याच्या गणेशोत्सवाशी जोडलेली सर्जनशीलता, भक्ती आणि सामूहिक प्रयत्नांची झलक पाहायला मिळाली.

या उपक्रमाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्यावर देण्यात आलेला भर. सहभागी अनेक सोसायट्यांनी आपल्या उत्सवांमध्ये इको-फ्रेंडली मूर्ती, पुनर्वापर करता येणाऱ्या सजावटीच्या साहित्याचा वापर आणि जबाबदार कचरा व्यवस्थापन यांसारख्या पद्धतींचा अवलंब केला. या प्रवेशिकांमधून परंपरांचा सन्मान राखत पर्यावरणाप्रती असलेली जबाबदारीही जपण्याचा प्रयत्न दिसून आला. प्रवेशिकांचे मूल्यांकन तीन श्रेणींमध्ये करण्यात आले – बेस्ट बिर्ला ओपस 'हाऊस ऑफ गणपती', मोस्ट युनिक मूर्ती आणि बेस्ट इको-फ्रेंडली मंडळ. शॉर्टलिस्ट करण्यात आलेल्या सोसायट्यांचे मूल्यांकन ज्युरी पॅनेलने सर्जनशीलता, अंमलबजावणी, नाविन्यपूर्णता आणि एकूण परिणाम या निकषांवर केले.

प्रत्येक प्रवेशिकेत रहिवाशांचा उत्साह आणि समर्पण दिसून आले, ज्यामुळे गणेशोत्सव त्यांच्या कम्युनिटीसाठी एक संस्मरणीय अनुभव ठरला.

ग्राहकांच्या विश्वासाला कायम पात्र ठरण्याच्या प्रवासातील पुढचे पाऊल

■ पुणे(दै. संध्या)



पहले इस्तेमाल करें, फिर विश्वास करें

आरएसपीएल ग्रुपने आज घडी डिटर्जंटची नवी मोहीम "विश्वास की परीक्षा" लाँच केल्याची घोषणा केली. या मोहिमेत बॉलिवूड सुपरस्टार माधुरी दीक्षित ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून सहभागी झाल्या आहेत. "विश्वास की खास बात ये है कि, उसपर हमेशा खरा उतरना पड़ता है" - या विश्वासावर आधारित ही मोहीम तयार करण्यात आली आहे. विश्वासाविषयीची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यावर नेहमी खरे उतरावे लागते. हाच संदेश देत ही मोहीम, ब्रँडवर विश्वास ठेवणाऱ्या भारतातील लाखो कुटुंबांसाठी उत्पादनाचा अनुभव सातत्याने अधिक चांगला करण्याच्या घडीच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते.

ही मोहीम नव्याने विकसित करण्यात आलेल्या फॉर्म्युलेशनवर केंद्रित आहे, जे भारतातील शहरी आणि निमशहरी भागांमधील ग्राहकांच्या बदलत्या कपडे धुण्याच्या सवयी लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहे. या मोहिमेच्या केंद्रस्थानी एक कॅम्पेन फिल्म आहे, जी प्रभावी "विश्वास की परीक्षा" च्या माध्यमातून ऑल-न्यू घडी पॅकच्या कार्यक्षमतेच्या आणि विश्वासाच्या वचनाला वास्तविक स्वरूप देते. या चित्रपटामध्ये भारतीय ब्रँडवरील दीर्घकालीन विश्वास आणि भारतातील सर्वाधिक लोकप्रिय व्यक्तिमत्त्वांपैकी एक असलेल्या माधुरी दीक्षित यांचे चिरंतन आकर्षण एकत्र आणण्यात आले आहे. नवीन घडीची विविध प्रत्यक्ष चाचण्यांमधून पडताळणी केली जाते. त्याच्या सुपरफाईन पावडरपासून ते जलद विरघळण्याच्या क्षमतेपर्यंत, अधिक समृद्ध फेसापासून ते उत्कृष्ट पांढरेपणापर्यंत, उत्पादनाच्या कामगिरीच्या आधारे ब्रँडचे दावे सिद्ध करण्यात येतात.

स्तोत्रातून तरुणाईला नवी दिशा मिळेल!

■ पुणे (दै. संध्या)

"स्तोत्रातून तरुणाईला नवी दिशा मिळेल. बालवयातच स्तोत्रपठणाची गोडी निर्माण झाली, तर संस्कारक्षम आणि आपल्या संस्कृतीशी जोडलेली पिढी घडण्यास निश्चितच हातभार लागेल," असे प्रतिपादन ह.भ.प. प्रा. प्रज्ञा पंडित यांनी केले.

पुणे येथील सदाशिव पेठेतील रिद्धी-सिद्धी गणेश मंदिरात गणेशोत्सवानिमित्त आयोजित गणेश सहस्रनाम पठण व दुर्वार्चन विधीप्रसंगी त्या बोलत होत्या. नागनाथपार गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित या उपक्रमात बालिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. बालिकांनी सामूहिकरीत्या गणेश सहस्रनामाचे पठण केले तसेच दुर्वार्चन विधीतही सहभाग घेतला.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक उपासनेसह बालपिढीमध्ये स्तोत्रपठणाची आवड निर्माण करण्याचा हा अभिनव उपक्रम लक्षवेधी ठरला. लहान वयातच स्तोत्रपठणाची ओळख आणि त्यातून संस्कारांची जडणघडण व्हावी, या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थित भाविकांनी कौतुक केले.



गणेशोत्सव मंडळांनी केवळ पारंपरिक उत्सवापुरते मर्यादित न राहता संस्कारक्षम आणि समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. नागनाथपार गणेशोत्सव मंडळाने हाती घेतलेला हा अभिनव उपक्रम निश्चितच अनुकरणीय असून, अशा उपक्रमांतून उत्सवाला संस्कार आणि सामाजिक बांधिलकीची जोड मिळते. स्तोत्रपठणाच्या माध्यमातून बालपिढीला आपल्या संस्कृतीशी जोडण्याचा मंडळाचा प्रयत्न विशेष कौतुकास्पद आहे. या उपक्रमाचा आदर्श इतर गणेशोत्सव मंडळांनीही घ्यावा, असे प्रा. प्रज्ञा पंडित यांनी सांगितले.

वेद-पुराणांमध्ये असलेल्या विविध स्तोत्रांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी, त्यांचे महत्त्व समाजाला समजावे आणि स्तोत्रपठणाची परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचावी, यासाठी प्रा. प्रज्ञा पंडित सातत्याने कार्यरत आहेत. स्तोत्रांच्या प्रचार-प्रसाराबरोबरच त्यामागील भावार्थ आणि सांस्कृतिक महत्त्व समाजापर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे.

युवा पिढीला भारतीय संस्कृती, स्तोत्रपरंपरा आणि सामूहिक प्रार्थनेशी जोडणाऱ्या या उपक्रमासाठी नागनाथपार गणेशोत्सव मंडळाचे आयोजक, नियोजक आणि समन्वयक यांचे प्रा. प्रज्ञा पंडित यांनी आभार मानले.

थोडक्यात पण महत्वाचे



शिक्षणाबरोबर वारकरी सांप्रदायाचे शिक्षण विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे : निलेश महाराज

पाटण (सातारा) : दैनिक संध्या

श्री ज्ञानोबा तुकोबा वारकरी शिक्षण मंडळ सूर्यवंशीवाडी (म्हसोबाचा माळ), तालुका-पाटण,जिल्हा-सातारा या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गुरुवर्य मृदुंग अलंकार निलेश महाराज यांनी शालेय शिक्षणाबरोबर वारकरी सांप्रदायाचे शिक्षण विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे का आहे हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शनातून पटवून दिले.विद्यार्थ्यांना कीर्तन भजन याची गोडी लागावी तसेच वारकरी संस्थेत शिक्षण घेऊन मुले मुली उत्कृष्ट कीर्तनकार बनली पाहिजेत व त्यांना सांप्रदायिक शिक्षणाची आवड होणे महत्त्वाचे आहे असे देखील संस्थेचे निलेश महाराज यांनी सांगितले.श्री ज्ञानोबा तुकोबा वारकरी शिक्षण संस्थेत शालेय शिक्षणासहित वारकरी शिक्षण विद्यार्थ्यांना मोफत दिले जाते. संस्थेत एका वर्षामध्ये विद्यार्थ्यांकडून हरिपाठ पाठ करून घेतला जातो,गीतेचा १५ वा अध्याय पाठ करून घेतला जातो.काकडा शिकवला जातो.ज्ञानेश्वरीच्या ५० ओव्या पाठ करून घेतल्या जातात.पखवाज वाजविणे शिकवले जाते.वारकरी पाऊल अतिउत्तम प्रकारे शिकवले जाते.ताल कसा वाजवायचा हे अतिउत्तम प्रकारे शिकवले जाते. विद्यार्थ्यांच्या विशेष अखिल भारतीय पखवाज परीक्षा संस्थेत घेतल्या जातात.तसेच ज्या गरजू पालकांना आपल्या विद्यार्थ्यांना श्री ज्ञानोबा तुकोबा वारकरी शिक्षण संस्थेत शिक्षण घेण्यासाठी इच्छुक आहेत व ज्या कोणाला किर्तन करायचे असल्यास त्यांनी निलेश महाराज (मोबाईल नंबर- ९१३०२८१८७१) यांच्याशी संपर्क साधावा.



दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांसाठी मदतीचा हात; ₹५१ हजारांची मदत

मुंबई : दैनिक संध्या

राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकरी बांधवांना मदत मिळावी, या उद्देशाने राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस श्री. श्रीकांत शिंदे यांनी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ₹५१ हजारांचा धनादेश आज मुंबईतील देवगिरी निवासस्थानी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्याकडे सुपुर्द केला. संकटाच्या काळात शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी सामाजिक बांधिलकी जपत पुढाकार घेणे ही कौतुकास्पद बाब आहे. दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि त्यांना आवश्यक ती मदत उपलब्ध व्हावी,यासाठी शासनासोबतच समाजातील विविध घटकांनीही पुढे येणे गरजेचे आहे,असे उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांनी यावेळी सांगितले. शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात मदतीचा हात पुढे करून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या श्री.श्रीकांत शिंदे यांच्या उपक्रमाचे उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांनी कौतुक केले.

स्वसंरक्षण कार्यशाळेचे आयोजन



पुणे : दैनिक संध्या

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, गणेशखिंड येथे इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थिनींसाठी महिला स्वसंरक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. पंख संस्थेच्या 'शाळांगण' समुपदेशन प्रकल्पांतर्गत ही कार्यशाळा घेण्यात आली. भारतीय सैन्याच्या माजी अधिकारी कॅप्टन तनुजा काब्रे यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे महत्त्व, सुरक्षिततेबाबत जागरूकता, प्रसंगावधान आणि संकटाच्या वेळी योग्य निर्णय घेण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी स्वसंरक्षणाच्या विविध तंत्रांचे प्रात्यक्षिक करून दाखवले आणि विद्यार्थिनींकडून त्यांचा सराव करून घेतला. कार्यशाळेत सुमारे २२५ विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रत्यक्ष सराव आणि संवादात्मक पद्धतीमुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास व सुरक्षिततेबाबतची जाणीव वाढली. धैर्य, आत्मविश्वास आणि स्वतःच्या सुरक्षिततेची जबाबदारी घेण्याची भावना निर्माण करणे, हा उपक्रमाचा उद्देश होता. यावेळी मुख्याध्यापिका रोहिणी काळे, पर्यवेक्षिका विद्या वाईकर, पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, समुपदेशक व शिक्षक उपस्थित होते.

विवेक गुप्ता यांना पदोन्नती



पुणे : दैनिक संध्या

भारतातील अग्रगण्य खासगी जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या बजाज लाईफ इन्शुरन्सने आज विवेक गुप्ता यांची चीफ ऑपरेशन्स अँड कस्टमर एक्सपीरियन्स ऑफिसर म्हणून पदोन्नती जाहीर केली. आपल्या नवीन भूमिकेत, ते ऑपरेशनल उत्कृष्टता मजबूत करण्यावर आणि ग्राहक तसेच भागीदारांना अखंड अनुभव देण्यावर लक्ष केंद्रित करतील. विमा उद्योगात विवेक यांना दोन दशकांहून अधिक अनुभव असून, व्यवसाय परिवर्तन, नावीन्य आणि धोरणात्मक वाढ घडवून आणण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्राहकांचा सहभाग वाढवण्यासाठी आणि उद्योग पद्धतींना नव्याने परिभाषित करण्यासाठी व्हर्च्युअल रिॲलिटी आणि कॉन्वर्सेशनल एआय यांसारख्या उपक्रमांचे यापूर्वी त्यांनी नेतृत्व केले. आपल्या विस्तारित भूमिकेत, कंपनीची संपूर्ण ऑपरेशन्स, ग्राहक अनुभव आणि एआय व नवोपक्रम या विभागांचे काम विवेक पाहतील. यामध्ये पॉलिसी सेवा, दावा व्यवस्थापन, जोखीम प्रशासन, पॉलिसी नूतनीकरण, तक्रार निवारण, शाखांचे कामकाज, व्यवसाय सातत्य, डिजिटल स्वयं-सेवा प्लॅटफॉर्म्स तसेच वितरक आणि भागीदार यांच्याशी समन्वय अशा बाबींचा समावेश असेल. प्रक्रिया सुलभीकरण, सेवा कार्यक्षमता वाढवणे, एआय-आधारित नवोपक्रमांना चालना देणे आणि पॉलिसीच्या संपूर्ण कालावधीत ग्राहकांना अखंड आणि सुलभ अनुभव मिळवून देणे या गोष्टींवर लक्ष केंद्रित करतील.

आयुष्यात एकदाच येणाऱ्या गुंतवणुकीच्या मागे धावू नका

सूचीबद्ध कंपन्या स्टार्टअप्सची पुढची लाट निर्माण करू शकतात : निलेश शाह

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

गुंतवणूकदारांनी पुढील मोठ्या प्रगतीशील कंपनीत गुंतवणूक करण्याची संधी हुकण्याची भीती बाजूला ठेवली पाहिजे, कारण आकर्षक संधी सातत्याने निर्माण होत राहतील, असे कोटक ॲसेट मॅनेजमेंट कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर निलेश शाह यांनी कोटक प्रायव्हेटच्या टेक अँड काउंटर टेक (टीएसीटी) मध्ये सांगितले. "संपत्ती निर्मितीचे भविष्य सार्वजनिक बाजारपेठांकडून खाजगी बाजारपेठांकडे वळत आहे का?" या विषयावर केवळ निमंत्रितांसाठी आयोजित विचारवंत प्लॅटफॉर्मवर मत व्यक्त करताना शाह यांनी गुंतवणूकदारांना बाजारपेठेतील तात्कालिक चर्चा किंवा घाईगडबडीमुळे आर्थिक शिस्त सोडू नये, असा इशारा दिला. "विक्रेत्या बाजूने ही आयुष्यात एकदाच येणारी संधी असल्याचे सांगितले जात असले, तरी तुम्ही कधीही अशा गुंतवणुकीच्या मागे धावू नये,"



असे ते म्हणाले. तसेच एखादी संधी हुकणे म्हणजे कधीही भरून न येणारे नुकसान मानू नये, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांचा हा युक्तिवाद खाजगी बाजारपेठेतील व्यवहार, आयपीओ आणि उदयोन्मुख गुंतवणूक पर्यायांभोवती निर्माण होणाऱ्या फोमोला आव्हान देतो. प्रत्येक नवीन संधीकडे संपत्ती निर्मितीच्या चक्रात सहभागी होण्याची शेवटची संधी म्हणून पाहण्याऐवजी गुंतवणूकदारांनी संयम बाळगून योग्य निवड केली पाहिजे, असा सल्ला शाह यांनी दिला. उदाहरणाचा वापर करत ते म्हणाले की, एक ट्रेन सुटली, तरी मागून दुसरी ट्रेन येते. यामागचा मुख्य संदेश स्पष्ट होता: एखाद्या अयोग्य गुंतवणुकीमुळे होणारे नुकसान एखादी चांगली संधी हातातून निसटण्याच्या नुकसानापेक्षा खूप जास्त असू शकते.

स्टार्टअप्स आणि प्रस्थापित कंपन्यांमधील पारंपरिक तफावत कमी होत असल्याने गुंतवणुकीतील शिस्त विशेष महत्त्वाची ठरू शकते. काही सूचीबद्ध कंपन्या आपल्या संस्थेच्या अंतर्गत स्टार्टअप-शैलीची युनिट्स तयार करत आहेत, याचे वर्णन निलेश शाह यांनी केले, ज्यामध्ये मोठ्या कंपन्यांच्या कारभाराचे अनुकरण न करता स्वतंत्र संस्कृती, कार्यपद्धती आणि नवनिर्मितीची उद्दिष्टे समर्पित टीम्सना दिली जात आहेत.

जगभरातील केवळ तीन कंपन्यांद्वारे तयार केला जाणारा विशेष घटक विकसित करू इच्छिणाऱ्या भारतातील एका उत्पादक कंपनीचे उदाहरण देत निलेश शाह म्हणाले की, त्या कंपनीने स्वतंत्र संशोधन आणि विकास युनिट स्थापन केले, ज्यांची "स्वतःची स्वतंत्र संस्कृती, स्वतःच्या कामाच्या वेळा होत्या आणि मुख्यालयाशी थेट संबंध नव्हता." त्या टीमला स्पष्ट उद्दिष्ट देण्यात आले होते: "हा घ्या निधी, हे आहे तंत्रज्ञान. पुढे जा आणि आपले ध्येय साध्य करा." पुढच्या पिढीतील वाढीव क्षमता असणाऱ्या व्यवसायांचा शोध घेणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी याचे मोठे परिणाम होऊ शकतात. नाविन्यता आता केवळ खाजगी निधी मिळवणाऱ्या स्टार्टअप्सपुरती मर्यादित राहणार नाही.

पुरेसे भांडवल, वितरण व्यवस्था आणि कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव असणाऱ्या प्रस्थापित कंपन्या सूचीबद्ध कंपनीची ताकद कायम ठेवून अंतर्गत पातळीवर उद्योजक उपक्रम उभारू शकतात. "मला विश्वास आहे की, स्टार्टअप्स नाविन्यता आणतील आणि मोठ्या कंपन्या निष्प्रभ ठरतील ही तफावत आता हळूहळू कमी होईल," असे शाह म्हणाले.

जेसीबीने हायड्रोमॅक्स जागतिक विक्रमानंतर भविष्यासाठी मोठी गुंतवणूक केली

■ पुणे (दै. संध्या)

आपल्या अग्रगण्य हायड्रोजन तंत्रज्ञानासह जमिनीवरील ताशी ४०६.३२० मैल वेगाचा नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केल्यानंतर जेसीबीने ब्रिटिश उत्पादन क्षेत्रातील मोठी कटिबद्धता आणि युनायटेड स्टेट्समधील नवीन उत्पादन क्षमतेसह उज्ज्वल भविष्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. कंपनी आपल्या स्टॅफोर्डशायर येथील वर्ल्ड हेडक्वार्टर्सच्या नूतनीकरणासाठी मोठी गुंतवणूक करत आहे, तसेच अमेरिकेत टेक्सासच्या सॅन अँटोनियो येथील जेसीबी जगातील सर्वात मोठी नवीन फॅक्टरी पुढील महिन्यात सुरू होणार आहे, जिथे पुढील पाच वर्षांत १,५०० रोजगार निर्माण होतील. जेसीबी आपल्या पुढील वाटचालीसाठी गुंतवणूक करत असताना जॉर्ज बॅमफोर्ड हे त्यांचे वडील लॉर्ड बॅमफोर्ड यांच्यासोबत या कौटुंबिक कंपनीचे सह-अध्यक्ष बनणार आहेत. गेल्या ५० हून अधिक वर्षांतील जेसीबीच्या वरिष्ठ नेतृत्वामधील हा पहिलाच बदल आहे. या प्रदीर्घ काळात स्टॅफोर्डशायरमधून सुरू झालेला हा व्यवसाय २३ फॅक्टरीज आणि जगभरात २०,००० हून अधिक कर्मचाऱ्यांसह ब्रिटनची सर्वात मोठी खाजगी मालकीची उत्पादक कंपनी म्हणून नावारूपास आला आहे. जेसीबीने जागतिक स्तरावरील संमिश्र बाजारपेठ परिस्थिती आणि भू-राजकीय आव्हानांनंतरही २०२५ मधील आपली उत्तमकामगिरी केली असताना ही घोषणा करण्यात आली आहे. कंपनीची एकूण विक्री उलाढाल ५.७ अब्ज पाउंड झाली, करपूर्व नफा ६४२ दशलक्ष पाउंड राहिला आणि मशिन विक्री १,१३,४९८ युनिट्सवर पोहोचली, तर निव्वळ कर्ज शून्यावर राखत व्यवसाय कर्जमुक्त राहिला. उत्तर अमेरिकेतील स्थिर मागणी आणि भारतातील बाजारपेठेत १२ टक्के घसरण यानंतरही जेसीबीने आपल्या जागतिक बाजारपेठेतील हिस्सा वाढवला आहे.



प्राँटोकडून पुण्यात १५० व्यावसायिकांसाठी आरोग्य शिबिर

■ पुणे (दै. संध्या)

जागतिक हृदय दिनानिमित्त झटपट घरपोच सेवा देणाऱ्या प्राँटोने पुण्यात आपल्या व्यावसायिकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले. या शिबिरात १५० व्यावसायिकांची मोफत प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी करण्यात आली. हा उपक्रम प्राँटोच्या 'पॉवर-अप, पार्टनर बेनिफिट्स' कार्यक्रमाचा भाग आहे. व्यावसायिकांच्या आरोग्य, सुरक्षा, आर्थिक सुस्थिती आणि वैयक्तिक कल्याणाला पाठबळ देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

या आरोग्य शिबिरात सीबीसी, रक्तातील साखर, क्रिएटिनिन, लिपिड प्रोफाइल, एकूण लोह, टीएसएच/टीएफटी, एचबीए१सी आणि रक्तातील सरासरी ग्लुकोज अशा आठ मोफत तपासण्या करण्यात आल्या. या तपासण्यांद्वारे रक्ताचे आरोग्य, रक्तातील साखर, किडनीचे कार्य, कोलेस्ट्रॉल, लोह आणि थायरॉईडसह विविध आरोग्य निर्देशक तपासण्यात आले. या उपक्रमातून प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीच्या उपलब्धतेतील अंतरही अधोरेखित झाले. पुण्यातील सहभागी महिला व्यावसायिकांपैकी ८० टक्के



महिलांनी यापूर्वी कधीही आरोग्य तपासणी केली नव्हती. त्यामुळे अनेक महिलांसाठी ही मूलभूत आरोग्य तपासणी करून घेण्याची पहिलीच संधी ठरली. प्राँटोच्या विशेष प्रकल्प विभागाच्या उपाध्यक्षा दीपिका जयकिशन म्हणाल्या, "अनौपचारिक कामाला अधिक संघटित, सुलभ आणि सुरक्षित करण्याची संधी भारतासमोर आहे. प्राँटोमध्ये आम्ही व्यावसायिकांकडे केवळ सेवा प्रदाते म्हणून न पाहता, स्वतःची उपजीविका घडवणारे आणि अर्थव्यवस्थेला हातभार लावणारे कामगार म्हणून पाहतो. आरोग्यसेवा, विमा, सुरक्षा, आर्थिक साक्षरता आणि कौशल्यवृद्धी या बाबी त्यांच्या कामाच्या अनुभवाचा भाग बनाव्यात, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत." प्राँटोचा 'पार्टनर बेनिफिट्स' कार्यक्रम घरगुती

याशिवाय, प्राँटो बाजार नियामक सेबी आणि इतर भागीदारांच्या सहकार्याने आर्थिक साक्षरता सत्रे आयोजित करते. या सत्रांमध्ये फसवणूक प्रतिबंध, यूपीआय सुरक्षा आणि कर्ज व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले जाते. प्राँटोचे मॉडेल प्रशिक्षण व पडताळणी, पारदर्शक पेमेंट, तंत्रज्ञानाधारित सुरक्षा आणि विविध लाभांपर्यंत सुधारित पोहोच यावर आधारित आहे. पुण्यातील आरोग्य शिबिरातून व्यावसायिकांसाठी अधिक संघटित आणि विश्वासार्ह परिसंस्था निर्माण करण्याच्या कंपनीच्या प्रयत्नांना पुढे नेण्यात आले.

सेवा क्षेत्रातील व्यावसायिकांचा अनुभव आणि जीवनमान सुधारण्याच्या व्यापक उपक्रमाचा भाग आहे. बँक खाते किंवा पॅन कार्ड नसलेल्या व्यावसायिकांना ही कागदपत्रे मिळवण्यासाठी कंपनी मदत करते. नियमित पेमेंटमुळे व्यावसायिकांना औपचारिक आर्थिक व्यवस्थेशी जोडण्यास तसेच बँका आणि एनबीएफसीकडून कर्ज मिळवण्यास मदत होऊ शकते.

Elitecon International ने दक्षिण आफ्रिकेतील 'World Class 77' सोबत ६० दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचा निर्यात करार

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

Elitecon International Limited ने दक्षिण आफ्रिकेतील बॉक्सबर्ग येथील 'World Class 77' या कंपनीसोबत 'उत्पादन पुरवठा फ्रेमवर्क करार' (Product Supply Framework Agreement) केला आहे. या करारानुसार, कंपनीच्या नाशिक येथील प्रकल्पात तयार केलेली उत्पादने पुढील बारा महिन्यांत दक्षिण आफ्रिकेच्या बाजारपेठेत पुरवली जातील. २८ सप्टेंबर रोजी शेअर बाजारांना कळवण्यात आलेल्या या कराराचे मूल्य ६० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स (सुमारे ५७४.२० कोटी रुपये) इतके आहे. या करारामुळे कंपनीच्या आंतरराष्ट्रीय व्यवसायात दक्षिण आफ्रिकेचा समावेश झाला आहे; कंपनीचा व्यवसाय आधीच संयुक्त अरब अमिराती (UAE) आणि सिंगापूरमधील उपकंपन्यांद्वारे चालतो आणि ५० हून अधिक देशांमधील ग्राहकांपर्यंत पोहोचतो. या भागीदारीमुळे

"दक्षिण आफ्रिका आमच्यासाठी निर्यात व्यवसाय वाढवण्याची संधी घेऊन आली आहे आणि हा करार त्या बाजारपेठेत व्यावसायिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी एक सुव्यवस्थित आधार प्रदान करतो. आमचा आंतरराष्ट्रीय व्यवसाय विस्तारत असतानाच, उपलब्ध संधींची शिस्तबद्ध पद्धतीने अंमलबजावणी करण्यावर आमचे लक्ष केंद्रित आहे. करारावर स्वाक्षरी करणे आणि पहिली खेप (shipment) रवाना करणे या दरम्यानच्या काळात अनेक महत्त्वाची पण पडद्यामागची कामे असतात – जसे की तपशील निश्चित करणे, पॅकेजिंग, कागदपत्रे तयार करणे आणि जहाजाचे बुकिंग करणे. याच टप्प्यांवर या कराराचे यश किंवा अपयश अवलंबून असते." "दक्षिण आफ्रिकेत आमचा एक स्थानिक भागीदार आहे, अतिरिक्त क्षमता असलेला एक कारखाना आहे आणि एक अशी टीम आहे जिने आपल्या पहिल्या काही आठवड्यांतच दाखवून दिले आहे की ती व्यवहार पूर्ण करू शकते. आमचे काम आता अगदी सोपे आहे: प्रत्येक वेळी, वेळेवर माल पाठवणे," असे एलिटकॉन इंटरनॅशनल लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. प्रदीप कुमार म्हणाले.

कंपनीच्या नाशिक प्रकल्पाच्या परिसरात अतिरिक्त रोजगार आणि पुरवठा साखळीशी संबंधित हालचाली वाढण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पामध्ये मशीन ऑपरेटर्स, गुणवत्ता-खात्री (quality-assurance) कर्मचारी, पॅकर्स, तसेच निर्यात-दस्तऐवजीकरण आणि डिस्पॅच टीम्स अशा सुमारे २०० अतिरिक्त कर्मचाऱ्यांची गरज भासण्याची शक्यता आहे. तसेच, ज्या उत्पादन-रेषांची (production lines) क्षमता पूर्णपणे वापरली जात नव्हती, त्यांचा आता पूर्ण क्षमतेने वापर केला जाईल.

१९व्या यलो रिबन फेअरच्या माध्यमातून 'कला कृषी बाजार' पुण्यात

■ पुणे (दै. संध्या)

इशान्या फाउंडेशनचा प्रमुख उपक्रम असलेला 'यलो रिबन एनजीओ फेअर' आपल्या १९व्या विशेष आवृत्तीत एका नव्या स्वरूपात 'कला कृषी बाजार – द कॉन्शस लाइफस्टाइल बाजार' या नावाने पुन्हा एकदा पुण्यात येत आहे. इशान्या फाउंडेशनतर्फे नाबार्डच्या 'भारत ग्राम उत्सव'च्या सहकार्याने आयोजित हा पाच दिवसीय महोत्सव १ ते ५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत क्रिएटिसिटी मॉल, पुणे येथे सकाळी ११ ते रात्री ९ या वेळेत भरविण्यात येणार आहे. प्रदर्शनाला सर्वांसाठी विनामूल्य प्रवेश असून, वाहनांसाठी पुरेशी पार्किंग व्यवस्था उपलब्ध असेल. जगभरातील अनेकांना भारताच्या समृद्ध हस्तकलेतून प्रेरणा मिळते; मात्र या कलाकृतींचे खरे मानकरी त्या कारागिरांचे हात आणि हृदय आहेत, ज्यांनी पिढ्यान्पिढ्या या परंपरा जिवंत ठेवल्या



आहेत. आता या अस्सल कलावंतांचा आणि त्यांच्या कलेचा गौरव करण्याची वेळ आली आहे. प्रसिद्ध कोल्हापुरी चपलांपासून ते पिढ्यान्पिढ्या जपल्या गेलेल्या पारंपरिक हस्तकलांपर्यंत, भारतीय कारागिरांनी जगभरात प्रशंसा मिळविणाऱ्या अनेक कलाकृती आणि परंपरा निर्माण केल्या आहेत. 'कला कृषी बाजार' या कलाकृती ग्राहकांच्या अधिक जवळ आणतो आणि कारागिरांना प्रत्यक्ष भेटण्याची, त्यांच्या कलेमागील कथा जाणून घेण्याची तसेच स्थानिक हस्तकला, ग्रामीण उद्योजकता आणि भारतीय प्रतिभेला पाठबळ देण्याची संधी उपलब्ध करून देतो.

पाञ्चजन्यच्या 'सुशासन संवाद – मुंबई संकल्प'मध्ये नेते, विचारवंत आणि तज्ज्ञ एकत्र

मुंबईतील द ताज महाल पॅलेस, कुलाबा येथे शासन, नेतृत्व, सामाजिक जबाबदारी आणि भारताच्या विकासप्रवासावर झाले विचारमंथन

■ मुंबई (दै. संध्या)

पाञ्चजन्यच्या 'सुशासन संवाद – मुंबई संकल्प' या उपक्रमात प्रमुख लोकप्रतिनिधी, धोरणकर्ते, विचारवंत, सामाजिक नेते आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ एकत्र आले. मुंबईतील द ताज महाल पॅलेस, कुलाबा येथे आयोजित या संवादामध्ये सुशासन, नेतृत्व, सामाजिक जबाबदारी आणि भारताच्या विकासप्रवासासंदर्भात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

पाञ्चजन्यच्या संवादमालिकेतील या विशेष भागात 'सुशासन' या संकल्पनेवर तसेच अधिक सक्षम आणि जबाबदार भारत घडविण्यामध्ये संस्था, नेतृत्व आणि नागरिकांची भूमिका यावर विशेष भर देण्यात आला. सार्वजनिक जीवन, संस्कृती, शिक्षण, सामाजिक जबाबदारी आणि देशाच्या बदलत्या अपेक्षा यांसंदर्भातील विविध विषयांवरही यावेळी



विचारमंथन झाले. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. जिष्णु देव वर्मा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय कार्यकारिणीचे सदस्य श्री. व्ही. भागय्या, अमृता हॉस्पिटल, फरिदाबादचे आध्यात्मिक संचालक स्वामी निजात्मानंद पुरी, प्रसिद्ध चित्रपट निर्माते व दिग्दर्शक डॉ. चंद्रप्रकाश द्विवेदी, गोरखपूरचे खासदार व अभिनेते श्री. रवि किशन, अभिनेते श्री. नितीश भारद्वाज, महाराष्ट्र सरकारचे कॅबिनेट मंत्री श्री. नितेश राणे, सीमांत सेवा फाउंडेशनचे सचिव श्री. सिद्धार्थ पटनी, महिला उद्योजक श्रीमती छाया नंजप्पा आणि एनएसईचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आशीष कुमार चौहान उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या उद्घाटनपर भाषणात पाञ्चजन्यचे संपादक श्री. हितेश शंकर म्हणाले, "या संवादासाठी मुंबई हे योग्य ठिकाण आहे. परकीय आक्रमणे एखाद्या राष्ट्रासमोर आव्हान निर्माण करू शकतात; मात्र त्या राष्ट्राची जिद्द आणि विकासाची इच्छाशक्ती कमकुवत करू शकत नाहीत, याचे मुंबईचा इतिहास हे जिवंत उदाहरण आहे. 'सुशासन संवाद'च्या माध्यमातून प्रगतिशील आणि अर्थपूर्ण चर्चेद्वारे आपल्या समोर असलेल्या सामाजिक प्रश्नांवर नवीन उत्तरे शोधण्याच्या दिशेने योगदान देण्याचा पाञ्चजन्य चा प्रयत्न आहे. भारत २०४७ च्या विकसित भारताच्या संकल्पनेकडे वाटचाल करत असताना अशा संवादांचे महत्त्व अधिक वाढते. समाजावर चित्रपट आणि ओटीटी माध्यमांचा बदलता प्रभाव असो किंवा शिक्षण आणि आरोग्य क्षेत्र केवळ व्यावसायिक दृष्टिकोनातून चालविले जावे का, यासारखे प्रश्न असोत; आपल्या समाजाला आकार देणाऱ्या या विषयांचा खुलेपणाने, जबाबदारीने आणि दीर्घकालीन राष्ट्रीय दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक आहे."

महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. जिष्णु देव वर्मा म्हणाले, "विकसित भारत म्हणजे केवळ आर्थिक विकास किंवा आर्थिक मूल्यामध्ये वाढ नव्हे. सरकारी धोरणांचा शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोच होणे आणि समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत त्याचा लाभ पोहोचणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. ज्या व्यक्तींसाठी सरकारी धोरणे तयार केली जातात, त्यांच्यापर्यंत ती पोहोचली तरच विकसित भारताचा खरा अर्थ साकार होईल.



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
शुक्रवार, दि. ०२ ऑक्टोबर २०२६
दैनिक संध्या निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

थोडक्यात पण महत्वाचे



फ्लायओव्हर धोक्याच्या छायेत; भिंतींना तडे, सैल प्लास्टर अन् झाडांच्या मुळांचा धोका

पिंपरी : दैनिक संध्या

शहरातील फ्लायओव्हर, पूल आणि त्यांच्या संरक्षक भिंतींच्या देखभालीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अनेक ठिकाणी फ्लायओव्हरच्या भिंतींना तडे गेले असून, झाडांच्या मुळांनी भिंती आणि प्लास्टरला तडे जाण्याची प्रक्रिया सुरू आहे. काही ठिकाणी प्लास्टर सैल झाले असून, ते कधीही खाली कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे पादचारी, दुचाकीस्वार आणि वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. पालिकेकडून 'स्ट्रक्चरल ऑडिट सुरू आहे', 'झाडांच्या फांद्या व मुळे हटविण्यात येतील', 'धोकादायक भागांची पाहणी केली जात आहे' अशी उत्तरे वेळोवेळी दिली जातात. मात्र, प्रत्यक्षात धोकादायक ठिकाणांची तातडीने डागडुजी, सैल प्लास्टर काढणे, आवश्यक बॅरिकेडिंग किंवा कायमस्वरूपी दुरुस्ती होताना कितपत दिसते, हा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. विशेषतः ज्या ठिकाणी फ्लायओव्हरच्या भिंतीलगत नागरिकांची वर्दळ असते, त्याठिकाणी सैल झालेला प्लास्टर किंवा काँक्रीटचा भाग अचानक कोसळल्यास मोठी दुर्घटना होऊ शकते. दुचाकीस्वाराच्या अंगावर किंवा वाहनाच्या मार्गात अचानक मलबा पडल्यास जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. फ्लायओव्हरच्या भिंतीलगत वाढणारी झाडे आणि त्यांच्या मुळांचा संरचनेवर होणारा परिणाम हा स्वतंत्रपणे तपासण्याची गरज आहे. झाडे तोडणे हा एकमेव उपाय नसून, संरचनेला नुकसान होत असल्यास त्याची कारणमीमांसा, तांत्रिक तपासणी आणि कायमस्वरूपी दुरुस्ती आवश्यक आहे. नागरिकांच्या डोक्यावर धोका असताना प्रशासनाने 'पाहणी सुरू आहे' या भूमिकेतून बाहेर पडून 'दुरुस्ती पूर्ण झाली' अशी भूमिका घेण्याची गरज आहे. स्ट्रक्चरल ऑडिट करणे ही आवश्यक प्रक्रिया आहे; मात्र, ऑडिटमध्ये धोका निदर्शनास आल्यानंतर त्यावर प्रत्यक्ष उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे. अहवाल तयार होऊन तो कार्यालयीन कागदपत्रांमध्येच राहिला, तर नागरिकांचा धोका कमी होणार कसा, असा सवाल उपस्थित होत आहे. शहरात यापूर्वीही झाडे, पूल, फ्लायओव्हर आणि त्यांच्या परिसरातील धोकादायक स्थितीबाबत वृत्त प्रसिद्ध झाले आहे. मात्र, प्रत्येक वेळी पाहणी, कारवाई आणि दुरुस्तीचे आश्वासन देण्यापलीकडे परिस्थितीत अपेक्षित बदल होत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे.

चिखलीतील २० अनधिकृत बांधकामांवर तूर्तास कारवाईला 'ब्रेक'

पिंपरी : दैनिक संध्या

चिखलीतील मोई फाटा परिसरात इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेत उभारण्यात आलेल्या वीस अनधिकृत बांधकामांवर राष्ट्रीय हरित लवादाने कारवाईचे आदेश दिले होते. आदेशानुसार बांधकामधारकांची सुनावणी सुरू असतानाच सर्वोच्च न्यायालयाकडून कारवाईस स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे तूर्तास महापालिकेकडून होणारी कारवाई टळली आहे. इंद्रायणी नदी पूररेषेत चिखलीतील मोई फाटा येथे गट क्रमांक 7, 8, 9 आणि 10 मध्ये बेकायदा प्लॉटिंग सुरू असल्याची तक्रार सन 2023 मध्ये हरित लवादाकडे दाखल झाली होती. तक्रारीत नदीच्या पूररेषेवर अतिक्रमण झाल्याने पर्यावरण, नदीचा नैसर्गिक प्रवाह आणि भविष्यातील पूरस्थिती धोक्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानंतर लवादाने जिल्हाधिकारी व महापालिकेला प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. सुनावणीदरम्यान महापालिकेने यापूर्वी अनधिकृत बांधकामांवर पाडकाम करण्यात आले होते. मात्र, संबंधितांनी कोणतीही परवानगी न घेता पुन्हा बांधकाम उभारले. त्याची दखल घेत लवादाने हा कायद्याचा अवमान झाल्याचे निरीक्षण नोंदविले. तसेच, दोन वर्षे चाललेल्या सुनावणीनंतर प्रत्येक बाधिताला सुनावणीची संधी द्यावी. कायद्यानुसार तीन महिन्यांचा आत बांधकाम पाडण्याची कारवाई पूर्ण करावे, असे आदेश दिले होते. महापालिकेच्या क क्षेत्रीय कार्यालयाने बांधकामधारकांची सुनावणी घेतली. दरम्यान, बांधकामधारकांनी हरित लवादाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी 9 डिसेंबर 2026 ला होणार आहे.

पिंपरी-चिंचवडला आंद्रा धरणातून मिळणार आणखी १०० एमएलडी पाणी

पिंपरी : दैनिक संध्या

मावळ तालुक्यातील आंद्रा धरणातून थेट भूमिगत जलवाहिनीतून पाणी आणण्याच्या प्रकल्पासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अंदाजपत्रक समितीने 220 कोटी रुपयांच्या विस्तृत आराखड्याला (डीपीआर) मंजुरी दिली आहे. त्यामुळे या प्रकल्पातील प्रशासकीय अडथळा दूर झाला आहे. पाणीपुरवठा विभागासाठी निविदाप्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला आहे. लवकरच प्रकल्पाची निविदा काढण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहराला अतिरिक्त 100 एमएलडी स्वच्छ पाणी मिळणार आहे. शहराची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता महापालिकेने पाणीपुरवठा योजनांवर लक्ष केंद्रित केले आहे. शहरासाठी आंद्रा धरणातून अतिरिक्त 100 एमएलडी पाणी मिळणार आहे. त्यासाठी भूमिगत जलवाहिनीसह इतर कामांसाठी महापालिकेच्या अंदाजपत्रक समितीने 220 कोटी रुपयांच्या खर्चास मंजुरी दिली आहे. गेल्या काही वर्षांत हौसिंग सोसायट्या आणि वाढत्या शहरीकरणामुळे शहराचा विस्तार झपाट्याने झाला आहे. साहजिकच, यामुळे पाण्याची मागणीही प्रचंड वाढली आहे. सध्या शहराला प्रामुख्याने पवना धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, वाढत्या लोकसंख्येमुळे हा पुरवठा अपुरा पडू लागला होता. अनेक भागांत अपुरा आणि विस्कळीत पाणीपुरवठ्याची समस्या निर्माण होत होती. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आंद्रा आणि भामा आसखेड धरणातून पाणी आणण्याचे नियोजन केले होते. सद्य:स्थितीत पवना धरणातून 520 एमएलडी, आंद्रा धरणातून 100 एमएलडी पाणी उचलले जात आहे. तर, एमआयडीसीकडून 30 एमएलडी शुद्ध पाणी विकत घेतले जात आहे. आंद्रा धरणाचे पाणी थेट भूमिगत जलवाहिनीतून आणण्याचे नियोजन आहे. जॅकवेलचे काम पूर्ण होईपर्यंत महापालिका तळवडेजवळील निघोजे येथील इंद्रायणी नदीच्या बंधाऱ्यावरून दररोज 95 एमएलडी अशुद्ध पाणी उचलत आहे. त्यावर चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून ते शहरात पुरविले जात आहे. इंद्रायणी नदीतील ते पाणी अतिदूषित असल्याने नागरिकांच्या त्या पाण्याबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी आहेत. पाण्याचा रंग हिरवा असणे, वास येणे अशा तक्रारी आहेत. थेट धरणातून भूमिगत जलवाहिनीद्वारे पाणी आणल्याने ती समस्या सुटणार आहे.



३,५०० हून अधिक सफाई सेवकांची करण्यात आली तपासणी

■ पिंपरी(दै. संध्या)

शहराच्या स्वच्छतेची धुरा सांभाळणाऱ्या सफाई सेवकांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेला प्राधान्य देत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियानांतर्गत सफाई मित्र सुरक्षा शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. २८ आणि ३० सप्टेंबर रोजी झालेल्या या शिबिरांमध्ये अ, ब, क, ड, इ, फ, ग, ह, ज आणि ल या दहाही क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील आतापर्यंत ३,५०० हून अधिक सफाई सेवकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. थेरगाव येथील स्व. कै. शंकरराव गावडे कामगार भवन येथेही शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरांमध्ये हिमोग्लोबिन, रक्तदाब, मधुमेह आदींची मोफत तपासणी करण्यात आली. तसेच संतुलित आहार, नियमित व्यायाम, योगासने, प्राणायाम, ताणतणावाचे व्यवस्थापन आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कामाच्या स्वरूपानुसार आवश्यक सुरक्षा साधनांचा वापर करणे, आरोग्यविषयक चांगल्या सवयी अंगीकारणे आणि आजाराची प्राथमिक लक्षणे दिसून आल्यास वेळीच वैद्यकीय सल्ला घेण्याबाबतही सफाई सेवकांना मार्गदर्शन करण्यात आले.

"सफाई सेवक हे शहराच्या स्वच्छतेतील महत्त्वाचे घटक आहेत. कामाच्या स्वरूपानुसार आवश्यक सुरक्षा साधनांचा वापर करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आरोग्याची नियमित तपासणी करून योग्य ती काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आरोग्यविषयक समस्या सुरुवातीच्या टप्प्यातच लक्षात आल्यास त्यावर वेळेत उपाययोजना करता येतात. त्यामुळे सफाई मित्रांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे," असे उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी यावेळी सांगितले.

कचरा वेचकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत डॉ. ठेंगल यांच्या हस्ते सुरक्षा साधनांचे वाटप देखील यावेळी करण्यात आले.

शिबिराच्या माध्यमातून समाज विकास विभागाच्या महिला व बालकल्याण योजनांचीही माहिती देण्यात आली. महिला बचतगट, विधवा व घटस्फोटित महिलांसाठी स्वयंरोजगार, कौशल्य व व्यवसाय प्रशिक्षण तसेच महिलांसाठी विविध आर्थिक सहाय्य योजनांची माहिती देऊन पात्र महिलांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. "महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजनांचा लाभ गरजू आणि पात्र महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. आर्थिक सहाय्य, कौशल्य प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्याचा या योजनांचा उद्देश आहे. या योजनांचा लाभ गरजू महिलांपर्यंत पोहोचल्यास त्यांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणास मदत होईल," असेही डॉ. प्रदीप ठेंगल यांनी यावेळी नमूद केले.



युवाशक्तीला संधी देऊन सक्षम राष्ट्राची निर्मिती

■ पिंपरी(दै. संध्या)

तरुणांच्या हाताला रोजगार मिळवून देणे, त्यांना कौशल्य आणि नवोपक्रमाच्या बळावर पुढे जाण्यास प्रोत्साहित करणे आणि या युवाशक्तीच्या सहभागातून सक्षम, विकसित राष्ट्र घडवणे, हेच भाजपचे ध्येय आहे, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मंगळवारी केले.

चिंचवड विधानसभा मतदारसंघामध्ये आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली नवी सांगवी येथे आयोजित 'रोजगार महाकुंभ – २०२६' मध्ये ते बोलत होते. आजच्या महाकुंभमध्ये ८ हजार १५७ युवक युवतींनी रोजगारासाठी नोंदणी केली. विविध कंपन्यांमध्ये या युवकांच्या मुलाखती पार पडल्या. यामध्ये ३ हजार २०० हून युवक युवतींना रोजगाराची संधी प्राप्त होणार आहे. काही निवड झालेल्या उमेदवारांना चव्हाण यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात नियुक्तिपत्रे देण्यात आली. नवी सांगवी येथील न्यू मिलेनियम इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आयोजित 'रोजगार महाकुंभ'च्या निमित्ताने यावेळी महापौर रवि लांडगे, आमदार महेश लांडगे, उमा खापरे, माजी आमदार अश्विनी जगताप, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, भाजपा सरचिटणीस मधुकर बच्चे, प्रतिभा महिला प्रतिष्ठानच्या रूपाली देवकर, विद्या गोते यांच्यासह प्रतिष्ठानच्या सदस्या उपस्थित होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले की, २०१४ नंतर देशाच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी आणि व्यवस्थेतील भ्रष्टाचार व अडथळे दूर करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रयत्न केले. देशाला विकसित भारताच्या दिशेने न्यायचे असेल, तर प्रत्येक नागरिकाने राष्ट्रप्रथम ही भावना ठेवून आपले योगदान दिले पाहिजे. रोजगार मेळावे युवकांना संधी देतात; त्या संधींचे रूपांतर कौशल्य, कष्ट आणि नव्या कल्पनांच्या बळावर प्रगतीत करणे तरुणांच्या हाती आहे, असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना चव्हाण म्हणाले, नवोपक्रमाबरोबरच अवकाश क्षेत्राशी संबंधित उद्योगांतही युवकांसाठी संधी निर्माण होऊ शकतात, याकडे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विशेष लक्ष दिले. यातून या क्षेत्रातही वेगळ्या संधी आज उपलब्ध होत आहे. पारदर्शक कार्यपद्धती आणि उद्योगांना पोषक वातावरण यामुळे गुंतवणुकीला चालना मिळते, असे सांगताना त्यांनी पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामकाजाचा उल्लेख केला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सप्टेंबर २०२६ अखेर २१ अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त

■ पिंपरी(दै. संध्या)

वर्षानुवर्षे निष्ठा, शिस्त आणि कर्तव्यभावनेने शहराची सेवा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांमुळेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका भक्कम पायावर उभी आहे, अशा शब्दांत सह आयुक्त मनोज लोणकर यांनी सेवानिवृत्तांच्या कार्याचा गौरव केला.

महानगरपालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत मधुकर पवळे सभागृहात आयोजित सोहळ्यात सप्टेंबर २०२६ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले १९ आणि स्वेच्छानिवृत्ती घेतलेले २ असे एकूण २१ अधिकारी व कर्मचारी यांचा सह आयुक्त मनोज लोणकर यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह मुख्य लिपिक माया वाकडे तसेच नंदकुमार इंदलकर विविध विभागांतील अधिकारी-कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते माहे सप्टेंबर २०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्यांमध्ये उपअभियंता गणेश राऊत, कार्यालय अधीक्षक रमेश यादव, मुख्याध्यापक पुष्पा शिंदे, रजनी आहेर, अनुजा सोनगरे, मुख्य लिपिक रामू गेंगजे, रोहिणी ढेंबरे, सिस्टर इनचार्ज पौर्णिमा आमले, जलधारा टिपले, कॉम्प्युटर ऑपरेटर अरुण गुंडगळ, उपशिक्षक नीलिमा भांबेरे, सुनिता शेजवळ, रखवालदार बाळू लांडगे, लिफ्टमन विलास गायकवाड, मजूर हंसराज सजनियाल, लक्ष्मण मानमोडे, पांडुरंग गवारी, सफाई कामगार सविता काळभोर आणि नंदकुमार भोंडवे यांचा समावेश आहे. तर स्वेच्छानिवृत्ती स्वीकारलेल्यांमध्ये सफाई कामगार राजेश गंगावणे आणि कचरा कुली गणेश यादव यांचा समावेश आहे. सेवानिवृत्तांच्या योगदानाबद्दल या सोहळ्यात कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

मोशीत ४ ऑक्टोबरला पुन्हा घुमणार हजारो ढोल-ताशांचा निनाद..!

■ पिंपरी(दै. संध्या)

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पुतळा "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण" ला ऐतिहासिक मानवंदना देण्याकरिता गतवर्षी मोशीत ढोल-ताशांचा विश्वविक्रमी निवाद करण्यात आला. यावर्षी पुन्हा एकदा या गगनभेदी सोहळ्याने शिव-शंभू विचारांचा गजर होणार आहे. "रणवाद्य" म्हणून हिंदवी स्वराज्याच्या इतिहासाची साक्ष असलेले ढोल-ताशा पथके यासाठी महाराष्ट्रभरातून पिंपरी-चिंचवडमध्ये दाखल होणार आहेत.

रविवार, ४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता बोऱ्हाडेवाडी, मोशी येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रात हा सोहळा होणार आहे.

आयोजित पत्रकार परिषदेत आयोजकांनी ही माहिती दिली. हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड आणि ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम होणार आहे.

यंदा पाच हजारांहून अधिक ढोलवादकांची नोंदणी पूर्ण झाल्याचे आयोजकांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

संशयितांची बॅग उघडली अन् सहा गुन्ह्यांचा पर्दाफाश

■ पिंपरी(दै. संध्या)

घरफोडी आणि दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करताना भक्ती-शक्ती चौकात संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या दोघांची बॅग तपासली असता घरफोडीचे साहित्य आढळून आले. त्यानंतर केलेल्या चौकशीत दोन घरफोड्या आणि चार दुचाकी चोरी अशा सहा गुन्ह्यांची उकल झाली. पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने ही कारवाई केली असून, तीन लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

विकास ऊर्फ जंगल्या मिलिंद कांबळे (३५, रा. पिंपरी) आणि गौतम धर्मलिंगम नाडार (२८, रा. राजगुरुनगर, ता. खेड) अशी ताब्यात घेतलेल्या संशयितांची नावे आहेत. पुढील कारवाईसाठी त्यांना काळेवाडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखा युनिट एकचे पथक सोमवारी (दि. २९) घरफोडी आणि दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने गस्त घालत होते. भक्ती-शक्ती चौकातील पीएमपीएमएल बसथांब्याजवळ दोन जण संशयास्पदरीत्या फिरताना दिसले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन पंचांसमक्ष बॅगची झडती घेतली. त्यामध्ये मोठे स्क्रू ड्रायव्हर, हातोडा, छन्नी आणि करवत असे घरफोडीसाठी वापरले जाणारे साहित्य मिळून आले. दोघांकडे कसून चौकशी केली असता काळेवाडी आणि मार्केट यार्ड पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील प्रत्येकी एक घरफोडी, तसेच चिखली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एक आणि संत तुकारामनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तीन दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आले. या गुन्ह्यांतील दुचाकींसह एकूण तीन लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. पोलिस उपायुक्त (गुन्हे) रोहिदास पवार, सहायक पोलिस आयुक्त डॉ. सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक रामेश्वर मोताळे, कर्मराज गावडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

व्हिसा मुदत संपल्यानंतरही अनधिकृतपणे वास्तव्यास असलेला अफगाण विद्यार्थी ताब्यात

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या दहशतवाद विरोधी शाखेने (एटीबी) आणि परकीय नागरिक नोंदणी विभागाने (एफआरओ) संयुक्त कारवाई करत व्हिसाची मुदत संपल्यानंतरही भारतात अनधिकृतपणे वास्तव्यास असलेल्या अफगाणिस्तानच्या एका विद्यार्थ्याला ताब्यात घेतले आहे. संबंधित विद्यार्थ्यावर डिपोर्टेशनची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या निर्देशानुसार एटीबीकडून आयुक्तालयाच्या हद्दीतील ओव्हरस्टे परदेशी नागरिकांचा शोध घेण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत एफआरओकडून मिळालेल्या माहितीनुसार अफगाणिस्तानचा नागरिक दानियार हुसेन (वय २६) हा पिंपरी-चिंचवड परिसरात अनधिकृतपणे राहत असल्याची माहिती मिळाली होती.

टीबीचे पोलीस निरीक्षक विकास राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय माहितीदार व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे संबंधित विद्यार्थी पुण्यातील बावधन परिसरातील पेबल्स अर्बानिया सोसायटी येथे राहत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार एटीबी, एफआरओ आणि बावधन पोलिसांच्या संयुक्त पथकाने रविवारी (दि. २८ सप्टेंबर)



छापा टाकून त्याला ताब्यात घेतले. चौकशी दरम्यान दानियार हुसेन हा शिवाजीनगर येथील मॉडर्न कॉलेजमध्ये एम.ए. (इकोनॉमिक्स) द्वितीय वर्षाचा विद्यार्थी असल्याचे समोर आले. मात्र तो जानेवारी २०२६ पासून महाविद्यालयात गैरहजर असल्याचेही आढळून आले.

पासपोर्ट आणि व्हिसा पडताळणीमध्ये त्याचा निवासी परवाना (Residential Permit) ३१ जानेवारी २०२६ रोजी संपुष्टात आला असून त्याला कोणतीही मुदतवाढ मिळालेली नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे तो भारतात बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्यावर आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणताही परदेशी नागरिक घर, फ्लॅट, बंगला किंवा हॉटेलमध्ये वास्तव्यास आल्यास त्याची माहिती सी-फॉर्मद्वारे २४ तासांच्या आत एफआरओकडे देणे बंधनकारक आहे. नियमांचे पालन न केल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल.

थोडक्यात पण महत्वाचे



१ ऑक्टोबरला होणार नांदी संमेलन

पुरंदर : दैनिक संध्या

पुण्यात होणार असलेल्या १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनापूर्वी राज्यात ९९ नांदी संमेलने होणार आहेत त्यापैकी १० वे नांदी संमेलन सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात येत्या १ ऑक्टोबर रोजी होणार आहे. मराठी साहित्य परिषद पुणे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली साहित्य परिषदेच्या जेजुरी सासवड व सोपान नगर शाखा यांच्या वतीने हे संमेलन होणार असुन उद्घाटनं, व्याख्यान, परिसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रम अशी भरगच्च साहित्यिक मेजवानी रसिकांना मिळणार आहे. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या सासवड येथील कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते,साहित्य परिषद सासवड शाखा अध्यक्ष अँड दिलीप निरगुडे, सोपाननगर शाखेचे युसुफ सय्यद,जेजुरी शाखाध्यक्ष डॉ नारायण टाक, माजी अध्यक्ष अॅड. अण्णासाहेब खाडे यांनी ही माहिती दिली सकाळी १० वाजता उद्घाटनाने संमेलन प्रारंभ होणार असुन संमेलनाध्यक्ष डॉ नीलम गोऱ्हे यांच्या उपस्थितीमध्ये साहित्य परिषदेचे अध्यक्ष मिलिंद सोमण उद्घाटन करत आहेत. ८७ व्या मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष विजय कोलते, आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप व साहित्य परिषदेचे कार्यवाह सुनील महाजन आदी मान्यवर यावेळी हजर राहणार आहेत. त्यानंतर लगेचच जेष्ठ पत्रकार मधुकर भावे साहित्यातील राजकीय व्यक्तीमत्वे या विषयी व्याख्यानातुन आपली भूमिका मांडणार आहेत. दुपारच्या सत्रात जेष्ठ राजनितिज्ञ माधव भंडारी यांच्या अध्यक्षते खाली "राजकीय साहित्य व विचार सरणी" या विषयावर परिसंवाद होत असुन डॉ नारायण टाक व डॉ नानासाहेब पवार यात सहभागी होणार आहेत. ८७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. फ मुं. शिंदे व निमंत्रक रावसाहेब पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी ४ वाजता नांदी संमेलन समारोप होणार आहे. याच कार्यक्रमात सायंकाळी ५ वाजता साहित्य परिषद पुणे यांच्या वतीने सत्यशोधक महात्मा ही नाट्यकृती सादर होणार आहे अशी माहिती आयोजकांनी पत्रकारांना दिली. आढावा बैठकीला संतोष काकडे, वसंतराव ताकवले, बाळासाहेब मुळीक, हेमंत ताकवले, सुनील लोणकर, प्रा संदीप टिळेकर, डॉ राजेश दळवी, माऊली घारे, दादासाहेब जगताप, अक्षय पवार, दादा मुळीक, जगदीश शिंदे आदी उपस्थित होते.प्रा नंदकुमार सागर यांनी यावेळी सर्वाचे आभार मानले.

कुमारी राजेश्वरी पवार यांना उत्कृष्ट पार्श्वगायिका पुरस्कार प्रदान

पुरंदर : दैनिक संध्या



धार पवार सामाजिक प्रतिष्ठानचा वर्ष 2024 चा पुरस्कार व असे अनेक पुरस्कार विजेती तसेच "गौरव महाराष्ट्राचा" व "सुर नवा ध्यास नवा" या रियालिटी शो मध्ये झळकलेली व "नाच ग घुमा" या चित्रपटात गायन केलेली सुमधुर गायनाने घरा घरात पोचलेली गायन क्षेत्रात चित्रपट/ सीरिअल्स यांना आपल्या आवाजाने गायन काम करत असताना पार्श्वगायिका कुमारी राजेश्वरी सुनिल पवार जिच्या आवाजाची महाराष्ट्र सरकारने दखल घेतली. त्यामुळे ६२ वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळ्यात पार्श्वगायिका विभागात "सजना" या मराठी चित्रपटातील "झोका" या गाण्यासाठी उत्कृष्ट पार्श्वगायिका हा पुरस्कार मिळाला असून या वर्षीची ती महाराष्ट्राची अवॉर्ड विजेती गायिका ठरली आहे. पार्श्वगायिका कुमारी राजेश्वरी पवार ही अखिल भारतीय मराठा महासंघ पुणे जिल्हा माझी उपाध्यक्ष सुनीलभाऊ पवार यांची कन्या आहे.पार्श्वगायिका कुमारी राजेश्वरी सुनिल पवार हिस्सा मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून कौतुक होऊन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

२४८ वर्षानंतर मंदिराला नवे रूप; प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण सोहळा

पुरंदर : दैनिक संध्या

पुरंदर तालुक्याच्या पश्चिम भागातील पठारीमंडण/ चांबळीगाव येथे श्रीगुरूंच्या चरणातून चंद्रकोर आकार देऊन वाहणारी चरणावती/ भोगावती नदीकाठवर असलेले ग्रामदैवत श्री. काळभैरवनाथ- जोगेश्वरी मंदिराजवळील कबीर-वाड्यात शिर्डीचे साईबाबांचे गुरु श्री.सद्गुरू शहामुनी महाराजांची संजीवन समाधी आहे. या समाधी कबीर-मंदिराचा नुकताच जीर्णोद्धार करण्यात आला. यानिमित्त श्रावण नारळी पौर्णिमा गुरुवार दि. 27/ 8/ 2026 रोजी कबीर-वाड्यात श्रीकृष्ण मूर्तीची प्राणप्रतिष्ठा वेदमूर्ती मंदार खळदकर गुरुजी आणि कलशारोहण आचार्य मंदार स्वामी येनपुरे यांच्या हस्ते झाला. हा सोहळा चांबळीगाव ग्रामस्थ आणि भाविकांच्या उपस्थित उत्साहात पार पडला. यापूर्वी समाधी स्थळाचे बांधकाम अत्यंत साध्या स्वरूपाचे होते. या मंदिराचा जीर्णोद्धार व्हावा म्हणून पावसचे स्वरूपानंद स्वामी आणि भिवडीगावचे साधूबाबा यांची मनोमन इच्छा होती. इ.स. 2019 रोजी श्री विजय महाराज भिसे यांना श्री सद्गुरु शहामुनी महाराज यांनी दृष्टांत दिला की माझ्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्या अगोदर भिसे वाड्यातील मोठ्या आई मंदिराचा जिर्णोद्धार करावा कारण "मोठी आई देवी ही ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांची आई आहे." मी तुमच्या बरोबर आहे."हा दृष्टांत झाल्यानंतर काही दिवसांनी विजय भिसे महाराजांना शहामुनी महाराजांनी श्रीकृष्ण रूपामध्ये दर्शन देऊन अनुग्रह दिला . या अशा अनेक घटनेनंतर विजय भिसे महाराजांनी इ.स. 2019 रोजी प्रथम 'मोठीआई " मंदिराचा जीर्णोद्धार केला . नंतर चांबळी ग्रामस्थ आणि भाविक भक्तांच्या सहकार्याने कबीर- मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे काम हाती घेऊन ते काम इ.स. 2026 मध्ये पूर्ण केले. शहामुनी महाराजांच्या पंजोबांचे नाव " शहाबाबा' होते. शहाबाबा भक्ती ,ज्ञान आणि वैराग्याने परिपूर्ण होते. ते हिंदू सनातन धर्माचे अनुयायी असून वाराणसी येथे महादेवाची पूजा करत. औरंगजेबाच्या काळात शहाबाबांना बळजबरीने धर्मांतर करण्यात भाग पाडले होते. त्यानंतर ते अवंतिकेमध्ये आले. त्यांना मुलगा झाला त्यांचे नाव जनाजी ठेवले. जनाजी महाराष्ट्रात सिद्धटेक मध्ये आले. त्यांना मानसिंग हा मुलगा झाला. त्यानंतर हे कुटुंब नगर जिल्ह्यातील पेडगाव येथे आले तेथे मानसिंग यांना शके 1641 म्हणजे इ. स. 1719 मध्ये मुलगा झाला त्याचे नाव पंजाच्या नावावरून "शहाबाबा" ठेवले. शहाबाबा म्हणजेच शहामुनी महाराज वयाच्या 16 वर्षापर्यंत आई-वडिलांबरोबर राहिले. त्यानंतर त्यांनी भारत आणि भारताच्या बाहेरही ईश्वर शक्तीचे मूळ वास्तव्य कोठे आहे. या संदर्भात प्रवास केला. अनेक संत सद्गुरूंचे मार्गदर्शन घेतले. त्यांच्या हातून अनेक चमत्कार आपोआप होत होते. त्यावेळेस त्यांनी महानुभव पंथाची दीक्षा घेतली होती. या काळात त्यांनी आपल्या आई-वडिलांना म्हणजेच मानसिंग आणि आमाई यांना घेऊन जालना जिल्ह्यातील " शहागड " किल्ल्यामध्ये राहू लागले .तेथे शहामुनी महाराजांचे पादुका मंदिर आहे.



भारत फोर्ज तर्फे शेतकऱ्यांना फळझाडांचे मोफत वाटप

■ वाल्हे (दै. संध्या)

सामाजिक उत्तरदायित्व निधी (सी. एस.आर.) उपक्रमांतर्गत भारत फोर्ज लिमिटेड कंपनीच्या वतीने वाल्हे (ता. पुरंदर) परिसरातील शेतकऱ्यांसह ग्रामस्थांना मोफत फळझाडांच्या रोपांचे वाटप करण्यात आले.

पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण भागाचा शाश्वत विकास करणे या उद्देशाने भारत फोर्जचे बाबासाहेब कल्याणी तसेच सी.एस.आर .फंडाच्या प्रमुख लीना कल्याणी यांच्या हस्ते परिसरातील शेकडो शेतकऱ्यांसह ग्रामस्थांना जांभूळ नारळ यांसारख्या उच्च दर्जाच्या आणि अधिक उत्पादन देणाऱ्या रोपांचे वाटप करण्यात आले.

यावेळी वाल्हे ग्रामपंचायतीच्या प्रांगणात आयोजित केलेल्या कार्यक्रमात बाबासाहेब कल्याणी म्हणाले "केवळ उद्योगांचा विकास होणे हे आमचे ध्येय नसून ग्रामीण भागातील मुख्यतः शेतकरी समृद्ध होणे ही काळाची गरज आहे. वृक्षारोपण आणि फळबाग लागवडीमुळे शेतजमिनीची सुपीकता टिकून राहण्यास मदत होईलच, शिवाय आगामी काळात फळझाडांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना रोजगाराचे आणि उत्पन्नाचे नवीन साधन उपलब्ध होणार आहे.

या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या सदस्या प्राजक्ता दुर्गाडे जलदूत सागर काळे सरपंच अतुल गायकवाड उपसरपंच सागर भुजबळ सुकलवाडीचे सरपंच संदेश पवार आडाचीवाडीच्या सुवर्णा पवार वागदरवाडीचे सरपंच सुनील पवार यांसह अमोल खवले जयवंत भुजबळ सत्यवान सूर्यवंशी संभाजी पवार दीपक कुमठेकर ग्रामपंचायत सदस्य अमोल पवार तेजस दुर्गाडे आदी मान्यवर उपस्थित होते.



सासवड येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत टंग टाय संदर्भ सेवा शिबिराचे आयोजन

■ पुरंदर (दै. संध्या)

सेवा संकल्प अभियान अंतर्गत तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संभाजी साळुंके सर व पूर्व डॉ.विक्रम काळे सर व मा.वैद्यकीय अधिक्षक _डॉ. गजानन आकमार सर ग्रामीण रुग्णालय सासवड यांच्या मार्गदर्शनानुसार राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत टंग टाय TONGUE TIE संदर्भ सेवा शिबिराचे आयोजन दि.24/09/2026 रोजी ग्रामीण रुग्णालय-सासवड येथे करण्यात आले होते. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत कार्यरत पथकातील सर्व वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक परिचारिका व औषध निर्माण अधिकारी यांनी पुरंदर तालुक्यातील शाळा व अंगणवाडी मधील टंग टाय tongue tie चे पूर्वनिदान केलेले एकुण 18 लाभार्थी रुग्ण ग्रामीण रुग्णालय, सासवड येथील कान नाक घसा तज्ञामार्फत तपासणी करून घेतले.

तपासणी अंती शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या लाभार्थ्यांसाठी दि.29/09/2026 रोजी ग्रामीण रुग्णालय-सासवड येथे शस्त्रक्रिया शिबिराचे नियोजन करण्यात आले असता सदर शिबिरामध्ये 12 लाभार्थी शस्त्रक्रिया करीता पात्र ठरविण्यात आले होते, त्यापैकी 08 लाभार्थ्यांची आज शस्त्रक्रिया ग्रामीण रुग्णालय- सासवड येथे तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत यशस्वीरित्या करण्यात आली. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत टंग संदर्भ सेवा शिबिराचे आयोजनासाठी १) मा. उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ पुणे, ,२) मा.जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय औंध, पुणे, ,3) जिल्हा आरोग्य अधिकारी_जिल्हा परिषद पुणे, ,4) तालुका आरोग्य अधिकारी_पंचायत समिती पुरंदर, ,5)मा. वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय-सासवड*,6)डॉ.सुनील गुजर _(Surgeon उपजिल्हा रुग्णालय दौंड) ,7)डॉ.अर्चना शेडगे_(Surgeon ग्रा. रु.शिक्रापूर), 8)डॉ.कदम_(भूलतज्ञ ग्रा. रु.यवत,9)ग्रामीण रुग्णालय सासवड सर्व स्टाफ यांचे सहकार्य लाभले.

शाळांच्या मालकी हक्काचे प्रश्न निकाली लावण्याचा शिक्षक समितीचा निर्धार

■ पुरंदर (दै. संध्या)



राज्य शिक्षक समितीच्या फलटण तालुक्याची नूतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. गट साधन केंद्र फलटण येथे राज्यनेते उदय शिंदे, जिल्हाध्यक्ष किरण यादव, सरचिटणीस संतोष घोडके, विशाल कणसे यांच्या उपस्थितीत कार्यकारिणी निवड पार पडली. यावेळी अनेक शाळांचे मालकी हक्कांचे प्रश्न मार्गी लावण्याचा निर्धार नूतन कार्यकारिणीने जाहीर केला.

यावेळी तालुकाध्यक्षपदी किरण बोबडे, कार्याध्यक्षपदी श्री.अनिल राऊत, उपाध्यक्षपदी प्रशांत खताळ तसेच विलास बनकर, कोषाध्यक्षपदी राजानंद आढाव, संपर्कप्रमुख म्हणून जमीर पठाण तसेच प्रसिद्धी प्रमुखपदी प्रशांत देशपांडे यांची निवड जाहीर करण्यात आली.

यावेळी उदय शिंदे म्हणाले, "शाळांचे अनेक प्रश्न अद्यापही प्रलंबित आहेत. शिक्षकांना शाळाबाह्य कामांना जुंपले जात असून त्यामुळे शिक्षकांवरील मानसिक ताण वाढत आहे. त्यातच मुख्यालयाच्या प्रश्नाला विनाकारण वळण देण्याचा राजकीय कुटील डाव सुरु आहे. शिक्षकांनी मुख्यालयी राहण्याच्या बोंबा मारणाऱ्यांनी गावात शिक्षकांसाठी क्वार्टर्स उभाराव्यात." यावेळी माजी अध्यक्ष संतोष कोळेकर यांनी कवितेतून आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.

निवडीनंतर बोलताना प्रशांत खताळ म्हणाले, "शाळांच्या भौतिक सुविधांचा प्रश्न जसा महत्वाचा आहे तसाच शाळांच्या मालकी हक्कांचा प्रश्न देखील महत्वपूर्ण आहे. अनेक शाळा सरकारी, खासगी जागेत असल्याने त्यांना अनुदान नाकारले जाते. वन विभागाच्या अखत्यारीतील शाळांच्या मुख्याध्यापकांवर गुन्हे नोंद केले जातात. या प्रश्नावर राज्यभर आवाज उठवणार आहे."

जिल्हा कोषाध्यक्ष तानाजी वाघमोडे यांनी प्रस्तावना केली. विजयकुमार चांगण, सुभेदार डुबल यांनी मनोगत व्यक्त केले. निलेश कर्वे यांनी आभार मानले. शाळांचा सर्वांगीण विकास व्हावा तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्याचा नवीन सर्वंकष आराखडा शिक्षक समितीकडून तयार केला जात आहे.



सौ. जाधव यांना 'आदर्श ग्रामसेवा पुरस्कार'

■ पुरंदर (दै. संध्या)

महात्मा फुले ग्रामविकास प्रतिष्ठानच्या वतीने यंदाचा 'आदर्श ग्रामसेवा पुरस्कार' सामाजिक कार्यकर्त्या तथा आशा स्वयंसेविका सौ. नीता वीरसिंग जाधव यांना प्रदान करण्यात आला. दरवर्षी २२ सप्टेंबर रोजी कर्मवीर जयंतीचे औचित्य साधून प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांचा गुणगौरव तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात येतो.

महात्मा फुले ग्रामविकास प्रतिष्ठान गेल्या दशकभरापासून परिंचे पंचक्रोशीत विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे, सामाजिक उपक्रमांचे आयोजन करणे यांसह समाजातील विविध घटकांसाठी प्रतिष्ठान सातत्याने कार्यरत आहे.

सौ. नीता वीरसिंग जाधव यांनी गेल्या २० वर्षांपासून घराघरापर्यंत पोहोचून आरोग्यसेवा देण्याचे कार्य केले आहे. विविध शासकीय योजना व त्यांचे लाभ गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी त्या सातत्याने पुढाकार घेतात. तसेच गेल्या २५ वर्षांपासून बँका व विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी त्या कार्यरत आहेत.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गटांची निर्मिती व त्यांचे आर्थिक बळकटीकरण, बचत गटांना विविध व्यवसायांच्या संधी उपलब्ध करून देणे, महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे तसेच महिलांना उद्योजक बनविण्यासाठी विविध संस्थांच्या सहकार्याने प्रशिक्षण व शिबिरांचे आयोजन करण्यात त्यांचा सक्रिय सहभाग आहे. पंचक्रोशीतील अनेक गरजू महिलांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. तसेच विविध समित्या व दबाव गटांच्या माध्यमातून गावातील सामाजिक प्रश्नांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. गावातील वृद्ध व गरजू रुग्णांना मोफत उपचार मिळावेत यासाठीही त्या सातत्याने प्रयत्नशील राहिल्या आहेत.

स्वतः महिला उद्योजिका व नोकरदार असूनही सामाजिक बांधिलकी जपत समाजसेवेसाठी सातत्याने वेळ देणाऱ्या सौ. नीता जाधव या यशस्वी गृहिणी, कुटुंबप्रमुख, शांत, संयमी आणि कार्यतत्पर व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित आहेत. त्यांच्या दीर्घकाळाच्या सामाजिक योगदानाची दखल घेत महात्मा फुले ग्रामविकास प्रतिष्ठानने यंदाचा 'आदर्श ग्रामसेवा पुरस्कार' देऊन त्यांचा गौरव केला.

३५ प्रशिक्षणार्थी महिलांना चार चाकी वाहन चालक परवान्याचे वाटप

■ पुरंदर (दै. संध्या)



महिलांच्या सबलीकरणासाठी सिंगापूर (ता. पुरंदर) ग्रामपंचायतीच्या व श्री.शिवाजी नॉलेज सिटी संस्था, शिरूर यांच्या वतीने या प्रशिक्षण वर्गाचा अनोखा उपक्रम ऑगस्ट महिन्यापासून आयोजित केला होता.

महिलांमध्ये आत्मविश्वास आणि सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्यासाठी महिलांना २२ दिवस हे प्रशिक्षण दिले गेले. महिलांसाठी ते मोफत होते. हा एक आगळावेगळा व नावीन्यपूर्ण उपक्रम असल्याने गावातील तरुण मुली, नवविवाहिता यांच्यासह अनेक महिलांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला. यामध्ये जवळपास ३५ हून अधिक महिलांची प्रशिक्षणासाठी नोंद झाली. सकाळी ९ वाजल्यापासून ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मोटर ड्रायव्हिंगच्या माध्यमातून महिलांना हे प्रशिक्षण दिले जात होते. महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

यावेळी सरपंच अर्चना लवांडे,उपसरपंच विक्रांत पवार,सदस्य विशाल लवांडे, सौरभ लवांडे, संगिता वारे, चांगुणाबाई वाघमारे, मीना उरसळ ग्रामपंचायत अधिकारी निलमा धाऊत्रे संस्थेचे अध्यक्ष पंकज साबळे, शुभम उरसळ व सर्व महिला प्रशिक्षणार्थी उपस्थित होत्या.

"घर, संसार, मोलमजुरी, शेतीकाम यासाठी सतत राबणाऱ्या महिला, त्यांना यातून बाहेर पडायला मिळत नाही, त्यांच्या हातात कधी गाडीचे स्टिअरिंग येईल, अशी कल्पनाही मनात आली नव्हती. आत्ताच्या महिलांना किमान वाहन चालविता आले पाहिजे, या उद्देशाने ग्रामपंचायतीने हा उपक्रम राबविल्याने महिलांनी याचा लाभ घेतला.


ही कला अवगत झाल्यावर याचा महिलांना दैनंदिन जीवनात, बाजारपेठेत शेतमाल पोहोचवण्यास फायदा होईल; तर उदरनिर्वाहासाठी काही महिला वाहतूक व्यवसायासाठीही पुढे येतील, असे उपसरपंच विक्रांत पवार यांनी सांगितले.

"गावात एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण देण्याचा आमचा पहिलाच उपक्रम आहे. महिलांचा चांगला प्रतिसाद होता, त्या प्रशिक्षणही चांगल्या प्रकारे घेत होते.

ही कला लवकर अवगत करत होते. ग्रामपंचायतीने राबवलेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य असून, निश्चितपणे महिलांना याचा फायदा होईल, त्या स्वावलंबी होण्यासाठी मदत होईल, असे माजी उपसरपंच व विद्यमान सदस्य विशाल लवांडे यांनी सांगितले."



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



थोडक्यात पण महत्वाचे

रब्बी पिकांच्या आधारभूत किमतीत मोठी वाढ

नवी दिल्ली : शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला लाभदायक भाव मिळावा आणि रब्बी हंगामातील पिकांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी केंद्र सरकारने विपणन हंगाम २०२७-२८ साठी सर्व अधिदेशित रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार विषयक समितीच्या बैठकीत या वाढीस मंजुरी देण्यात आली.यामध्ये करडईच्या एमएसपीमध्ये सर्वाधिक ६७५ रुपये प्रति क्विंटल, तर रॅपसीड व मोहरीच्या एमएसपीमध्ये ४१३ रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे. मसूरच्या एमएसपीमध्ये ३९० रुपये, ज्वारी एमएसपीमध्ये १३६ रुपये, हरभऱ्याच्या एमएसपीमध्ये ८३ रुपये आणि गव्हाच्या एमएसपीमध्ये २५ रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे. विपणन हंगाम २०२७-२८ साठी सुधारित एमएसपीनुसार गव्हाला २,६१० रुपये, ज्वारी २,२८६ रुपये, हरभऱ्याला ५,९५८ रुपये, मसूरला ७,३९० रुपये, रॅपसीड व मोहरीला ६,६१३ रुपये आणि कुसुमला ७,२१५ रुपये प्रति क्विंटल एमएसपी मिळणार आहे. केंद्र सरकारने २०१८-१९ च्या केंद्रीय अर्थसंकल्पातील घोषणेनुसार एमएसपी अखिल भारतीय भारित सरासरी उत्पादन खर्चाच्या किमान दीडपट ठेवण्याचे धोरण कायम ठेवले आहे. त्यानुसार २०२७-२८ च्या एमएसपीमध्ये उत्पादन खर्चाच्या तुलनेत गव्हासाठी १०६ टक्के, रेपसीड व मोहरीसाठी ९६ टक्के, मसूरसाठी ९२ टक्के, हरभऱ्यासाठी ५९ टक्के, जौसाठी ५८ टक्के आणि करडईसाठी ५० टक्के मार्जिन अपेक्षित आहे. अन्नधान्याबरोबरच डाळी आणि तेलबियांचे उत्पादन वाढविण्यासाठी सरकारकडून या पिकांना तुलनेने उच्च एमएसपी देण्यावर भर दिला जात आहे. नव्या एमएसपीमुळे शेतकऱ्यांना लाभदायक दर मिळण्याबरोबरच पीक विविधीकरणाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

रानभाज्यांतून परंपरेचे संवर्धन, भरडधान्यांतून बाजारपेठेची नवी दिशा

धुळे : रानभाज्या म्हणजे केवळ जंगलातून मिळणारा आहार नसून आदिवासी समाजाने पिढ्यान्‌पिढ्या जपलेल्या पारंपरिक ज्ञानाचा, निसर्गाशीअसलेल्यानात्याचाआणिआरोग्यदायी जीवनपद्धतीचा अमूल्य ठेवा आहे. हे ज्ञान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासोबतच जल, जंगल आणि जमीन यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी केले. साक्री तालुक्यातील बारीपाडा येथे आयोजित 'वनभाजी स्पर्धा व मिलेट महोत्सव 2026' प्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार मंजुळा गावित, आमदार काशीराम पावरा, आमदार राजेश पाडवी, आमदार दिलीप बोरसे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप, तहसीलदार साहेबराव सोनवणे अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाचे गिरीश कुबेर, मैत्रबोध परिवाराचे श्रीमित्र जीवजी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील तसेच महोत्सवाचे आयोजक पद्मश्री चैत्राम पवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी, महिला बचत गट, ग्रामस्थ आणि आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिके करपली, पण आशा आणि लढण्याची जिद्द अजूनही जिवंत

धुळे : कुठे वाढ खुंटलेला कापूस... कुठे बोंडातच अडकलेली शेतकऱ्याची आशा... तर कुठे पाण्याअभावी पूर्ण वाढ न झालेला मका. शेतात उभे राहून ही दृश्ये पाहताना नुकसान केवळ पिकांचे नाही, तर वर्षभर राबलेल्या शेतकरी कुटुंबाच्या आशा-अपेक्षांचे असल्याची जाणीव प्रकर्षाने होत होती. अशा दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी आज शिंदखेडा तालुक्यातील चिमठाणे-शेवाडे रस्त्यालगतच्या अमराळे, अरावे तसेच साक्री तालुक्यातील छावडी परिसरातील दुष्काळग्रस्त शेतशिवाराची पाहणी केली. शेताच्या बांधावर जाऊन त्यांनी कापूस, मका व अन्य पिकांची स्थिती पाहिली. पाऊस न झाल्याने खुंटलेली वाढ, न भरलेली कणसे आणि न फुटलेली कापसाची बोंडे पाहत त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला.

वेळेवर उपचारासाठी 'स्टेमी महाराष्ट्र'चा आधार

हृदयाचा प्रत्येक ठोका महत्वाचा; ५० लाखांहून अधिक ईसीजी तपासण्या; ३४ जिल्ह्यांत २,४१५ स्पोक केंद्रे आणि ९९ हब रुग्णालयांचे जाळे

■ मुंबई (दै. संध्या)

हृदयविकाराचा झटका आल्यानंतरचा प्रत्येक सेकंद महत्वाचा असतो. 'गोल्डन अवर'मध्ये योग्य निदान आणि उपचार मिळाल्यास रुग्णाचा जीव वाचण्यास मदत होते. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'स्टेमी महाराष्ट्र' प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये हृदयविकाराचे तातडीने निदान आणि उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत आतापर्यंत ५० लाखांहून अधिक ईसीजी तपासण्या करण्यात आल्या असून, त्यामधून ३४ हजारांहून अधिक स्टेमी रुग्णांचे तसेच १ लाख ४५ हजारांहून अधिक इतर गंभीर हृदयविकाराच्या रुग्णांचे निदान करण्यात आले आहे.

'स्टेमी महाराष्ट्र' प्रकल्पांतर्गत राज्यात २,४१५ स्पोक शासकीय आरोग्य केंद्रे (जिल्हा, उपजिल्हा, ग्रामीण, सामान्य रुग्णालये, स्त्री रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र) आणि कॅथलॅब उपलब्ध असलेली ९९ हब रुग्णालये (खासगी रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालये, धर्मादाय रुग्णालये) कार्यरत आहेत. स्पोक केंद्रांमध्ये प्राथमिक पातळीवर ईसीजी तपासणी करून त्याचा अहवाल क्लाऊडवर अपलोड होतो. प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या मदतीने काही मिनिटांत ईसीजीचे विश्लेषण केले जाते. स्टेमीचे निदान झालेल्या रुग्णाला स्पोक रुग्णालयात सुविधा उपलब्ध असल्यास तातडीने थ्रोम्बोलायसिस उपचार देण्यात येतात. पुढील उपचारासाठी रुग्णाला १०८ रुग्णवाहिकेच्या मदतीने संबंधित हब रुग्णालयात पाठविण्यात येते.

सुरुवातीला राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये सुरू करण्यात आलेल्या या प्रकल्पाचा टप्प्याटप्प्याने विस्तार करण्यात आला. सध्या महाराष्ट्रातील ३४ जिल्ह्यांमध्ये २,४१५ स्पोक आरोग्य केंद्रे या प्रकल्पाशी जोडण्यात आली आहेत. तसेच ९९ हब रुग्णालये प्रगत हृदयविकार उपचारांसाठी सज्ज आहेत. हब रुग्णालयांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली उपचार, अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी, बायपाससारख्या सुविधा उपलब्ध आहेत. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत पात्र रुग्णांना संबंधित उपचारांचा लाभ मिळतो. त्यामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील रुग्णांना तातडीने योग्य उपचार केंद्राशी जोडणे शक्य होत आहे.

हृदयविकाराचा संशय असलेल्या रुग्णाची तातडीने ईसीजी तपासणी करणे हा स्टेमी प्रकल्पातील महत्त्वाचा भाग आहे. छातीत दुखणे, छातीत दडपण येणे, श्वास घेण्यास त्रास होणे, अचानक घाम येणे, चक्कर येणे, मळमळ होणे किंवा वेदना जबडा, मान, खांदा अथवा हाताकडे जाणे अशी लक्षणे आढळल्यास विलंब न करता वैद्यकीय मदत घेणे आवश्यक आहे.

मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, तंबाखूचे सेवन, शारीरिक हालचालींचा अभाव, असंतुलित आहार, अनुवंशिकता आणि मानसिक ताण यामुळे हृदयविकाराचा धोका वाढू शकतो. त्यामुळे प्रतिबंधात्मक तपासणीसह लक्षणे दिसताच तातडीने ईसीजी करणे महत्त्वाचे आहे. जागतिक हृदय दिनानिमित्त 'हृदयाचा प्रत्येक ठोका महत्वाचा' हा संदेश देत नागरिकांनी आपल्या हृदयाच्या आरोग्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात येत आहे. हृदयविकाराची लक्षणे दुर्लक्षित न करता वेळेत ईसीजी आणि आवश्यक उपचार घेणे, तसेच निरोगी आहार, नियमित शारीरिक हालचाल आणि व्यसनांपासून दूर राहणे, हे हृदयाच्या आरोग्यासाठी महत्वाचे आहे. STEMI म्हणजे ST Elevation Myocardial Infarction. हा हृदयविकाराच्या झटक्याचा एक गंभीर प्रकार असून, हृदयाच्या काही भागाला होणारा रक्तपुरवठा अचानक थांबल्यामुळे अपुऱ्या ऑक्सिजनमुळे हृदयाच्या स्नायूंना इजा होते. त्यामुळे हृदयविकाराचा झटका येतो.

उपचारासाठी प्रत्येक मिनिट महत्वाचा


"हृदयविकाराचा झटका आल्यानंतर उपचारासाठी प्रत्येक मिनिट महत्वाचा असतो. ग्रामीण भागातील नागरिकांनाही वेळेत ईसीजी तपासणी, अचूक निदान आणि आवश्यक उपचार मिळावेत, या उद्देशाने 'स्टेमी महाराष्ट्र' प्रकल्पाचा राज्यभर विस्तार करण्यात आला आहे. आज ३४ जिल्ह्यांमध्ये २,४१५ स्पोक आरोग्य केंद्रे आणि ९९ हब रुग्णालयांच्या माध्यमातून हृदयविकाराच्या रुग्णांना तातडीच्या उपचारांशी जोडले जात आहे. या प्रकल्पांतर्गत ५० लाखांहून अधिक ईसीजी तपासण्या होणे ही या उपक्रमाची व्यापक पोहोच दर्शविणारी बाब आहे. नागरिकांनी हृदयविकाराची लक्षणे दुर्लक्षित न करता तातडीने ईसीजी तपासणी करून आवश्यक वैद्यकीय उपचार घ्यावेत. 'हृदयाचा प्रत्येक ठोका महत्त्वाचा' हा संदेश प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे."

- प्रकाश आबिटकर, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण.

ईसीजी तपासणीची सुविधा

"हृदयविकाराची लक्षणे ओळखणे आणि वेळ न दवडता योग्य उपचार घेणे ही जनजागृतीची महत्वाची बाब आहे. 'स्टेमी महाराष्ट्र' प्रकल्पाच्या माध्यमातून ईसीजी तपासणीची सुविधा नागरिकांच्या जवळच्या शासकीय आरोग्य संस्थांपर्यंत पोहोचविण्यात आली आहे. विशेषतः मधुमेह, उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक आणि हृदयविकाराचा धोका असलेल्या नागरिकांनी नियमित आरोग्य तपासणीसह हृदयाच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे. वेळेवर निदान आणि उपचारातून अनेक गंभीर परिस्थिती टाळता येऊ शकतात."

- मेघना साकोरे-बोर्डीकर,
राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण.



भाषा हे विवादाचे नव्हे, तर सुसंवाद साधण्याचे माध्यम : मुख्यमंत्री फडणवीस

■ मुंबई (दै. संध्या)

भाषा हे विवादाचे माध्यम नसून सुसंवाद, समन्वय आणि समाजाला जोडण्याचे प्रभावी साधन आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

'पाञ्चजन्य'च्या वतीने मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या 'सुशासन संवाद : मुंबई संकल्प' या कार्यक्रमात पाञ्चजन्यचे संपादक हितेश शंकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष मुलाखत घेतली. यावेळी महाराष्ट्रासह देशातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण, कृषी, रोजगार आणि विकासाशी संबंधित विविध विषयांवर मुख्यमंत्र्यांनी मनमोकळा संवाद साधला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले बदलत्या हवामानाचे परिणाम गेल्या काही वर्षांत अधिक प्रकर्षाने जाणवत आहेत. त्यामुळे पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषण नियंत्रणासाठी राज्य शासनासोबतच समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देणे आवश्यक आहे. ऊर्जा क्षेत्रात स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढविण्यावर शासनाचा भर आहे. सौरऊर्जेच्या माध्यमातून वीजनिर्मितीचा वाटा वाढविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. हवामान बदलाचे परिणाम आणि प्रदूषण रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना केल्यास पर्यावरणाशी संबंधित अनेक समस्या दूर करता येतील, असे त्यांनी स्पष्ट केले. जमिनीची उत्पादकता टिकविणे, जलस्रोतांचे संवर्धन करणे आणि जलप्रदूषण रोखणे ही आगामी काळातील महत्त्वाची आव्हाने आहेत. जलस्रोतांमध्ये प्रदूषित पाणी जाणार नाही, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रातील पाण्याची उपलब्धता आणि भौगोलिक स्थिती यामध्ये असलेला असमतोल दूर करण्यासाठी दीर्घकालीन जलव्यवस्थापनावर भर देण्यात येत आहे. उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करून दुष्काळग्रस्त भागांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी विविध प्रकल्पांचे नियोजन करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

विदर्भातील वैनगंगा नदीचे समुद्राकडे वाहून जाणारे पाणी जलव्यवस्थापनाच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागांकडे वळविण्याच्या दृष्टीने वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे बुलढाणा तसेच विदर्भातील दुष्काळग्रस्त भागांना पाणी उपलब्ध होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.पश्चिम घाटातून पश्चिमवाहिनी नद्यांद्वारे समुद्रात जाणाऱ्या पाण्याचा अधिक प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीनेही नियोजन करण्यात येत आहे. अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त भागांकडे वळवून सिंचन आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. असेही त्यांनी सांगितले अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळावी, यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून विविध उपाययोजना राबविण्यात येत असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नियमानुसार केंद्र शासनाकडे राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीअंतर्गत (एनडीआरएफ) मदतीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येतात. पात्र लाभार्थ्यांना मदत थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येते. शेतकऱ्यांना सिंचन सुविधा, वीज उपलब्धता आणि आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पारदर्शक आणि प्रभावी पद्धतीने पोहोचविण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात येत आहे.



वारंवार पूरस्थितीचा सामना

महाराष्ट्रातील काही भागांना वारंवार पूरस्थितीचा सामना करावा लागतो, तर दुसऱ्या बाजूला अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई जाणवते. त्यामुळे अतिरिक्त पाण्याचे योग्य नियोजन करून त्याचा दुष्काळग्रस्त भागांसाठी उपयोग करण्याची गरज आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पूरस्थितीत उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी जलाशयांमध्ये वळविणे, नदीजोड प्रकल्प तसेच सिंचनाच्या माध्यमातून त्याचा उपयोग करणे यासाठी विविध उपाययोजनांवर काम सुरू आहे. या प्रकल्पांची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून, दीर्घकालीन जलव्यवस्थापनातून महाराष्ट्रातील दुष्काळाची समस्या कमी करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

औषध गुणवत्ता तपासणी यंत्रणा सक्षम करण्याचे निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील आरोग्य संस्थांमधील औषधांची गुणवत्ता तपासण्यासाठी 'काउंटरफिट ड्रग डिटेक्शन डिव्हाइस' या उपकरणाद्वारे प्रायोगिक तत्त्वावर आरोग्य संस्थांमधील औषध गुणवत्ता तपासणी करण्याचे निर्देश आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

मुंबईतील आरोग्यसेवा आयुक्तालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. राज्यातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण औषधे उपलब्ध करून देताना औषधांच्या गुणवत्तेशी कोणत्याही प्रकारची तडजोड होऊ नये यासाठी आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यात येत आहे. राज्यातील सर्व आरोग्य संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या औषध साठ्याची गुणवत्ता ड्रग डिटेक्शन मशीनद्वारे तपासण्यात येणार आहे. या तपासणीसाठी स्वतंत्र पथके तयार करण्यात येणार असून पथकांद्वारे राज्यातील आठही परिमंडळातील संस्थेमध्ये तपासणी केली जाईल. प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून सर्व आरोग्य संस्थांमधील औषधांची गुणवत्ता यात तपासली जाणार आहे. यासाठी आरोग्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या तज्ज्ञ औषधनिर्मात्यांची (फार्मासिस्ट) स्वतंत्र टीम तयार करण्यात येणार आहे. या टीमला ड्रग डिटेक्शन मशीनद्वारे औषधांची तपासणी करण्याचे प्रशिक्षण दिले जाईल. बैठकीत याचे सादरीकरण करण्यात आले. पुरवठा धारकांकडून पुरवठा करण्यात आलेल्या औषधांची दर्जाची तपासणी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या सूचनाही आरोग्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

या बैठकीला राज्य वस्तू खरेदी प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बापू पवार, आरोग्य संचालक (मुंबई) डॉ. नितीन अंबाडेकर, आरोग्य संचालक (पुणे)डॉ. विजय कंदेवाड, सह संचालक सुनिता गोल्हाईत उपस्थित होते.

ओबीसी आश्रमशाळांमधून दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर द्या

■ मुंबई (दै. संध्या)

इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत चालविण्यात येणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती (व्हीजेएनटी) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना प्रभावीपणे राबवाव्यात, असे निर्देश इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिले.

राज्यातील अनुदानित आश्रमशाळांमधील मान्यताप्राप्त मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत मंत्रालयात मंत्री सावे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. ओबीसी विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाच्या संचालिका सोनाली मुळे आदी उपस्थित होते. यावेळी शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर आश्रमशाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. चौथी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षांसह ऑलिम्पियाड परीक्षांची तयारी करून घेण्यासाठी विशेष नियोजन करावे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षमतेचा विकास करण्यासाठी नियमित सराव, मार्गदर्शन आणि आवश्यक शैक्षणिक उपक्रम राबवावेत, अशा सूचना मंत्री सावे यांनी दिल्या.

एमएसपीअंतर्गत खरेदी केलेल्या धान व भरडधान्याची प्रलंबित देयके तातडीने अदा करा : मंत्री भुजबळ



■ मुंबई (दै. संध्या)

किमान आधारभूत किंमत (एमएसपी) योजनेंतर्गत राज्यात खरेदी करण्यात आलेल्या धान व भरडधान्याची रक्कम संबंधित शेतकऱ्यांना वेळेत मिळावी, यासाठी प्रलंबित देयके तातडीने अदा करण्याचे निर्देश अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

पणन हंगाम २०२५-२६ मध्ये राज्यात एमएसपी अंतर्गत धानासह ज्वारी, मका, बाजरी आणि रागी या भरडधान्यांची खरेदी करण्यात आली आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार धानाची १,०३,८०,१९६.७० क्विंटल, ज्वारीची ५५,१८३.७० क्विंटल, मक्याची १०,०५,१११ क्विंटल, बाजरीची ५१०.५० क्विंटल आणि रागीची ४,६२४ क्विंटल खरेदी झाली आहे. तसेच रब्बी पणन हंगामातील खरेदीमध्ये धान, ज्वारी आणि मका यांचा समावेश असून उपलब्ध नोंदीनुसार एकूण १,०८,२१,४०४.६० क्विंटल खरेदी झाल्याचे नमूद आहे.

शेतकऱ्यांना अदा करण्यात आलेली रक्कम तसेच अद्याप अदा करावयाच्या प्रलंबित रकमेची विभागनिहाय माहिती संकलित करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादित धान व भरडधान्याची हमीभावाची रक्कम मिळण्यासाठी अनावश्यक विलंब होऊ नये, यासाठी प्रलंबित देयकांची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रक्कम जमा करण्याच्या सूचना मंत्री छगन भुजबळ यांनी दिल्या.

एमएसपी योजनेंतर्गत खरेदी प्रक्रियेत सहभागी सर्व संबंधित यंत्रणांनी उपलब्ध निधी, प्रलंबित देयके आणि आवश्यक प्रशासकीय कार्यवाहीचा तातडीने आढावा घेऊन शेतकऱ्यांची देयके प्राधान्याने अदा करावीत, असेही निर्देश त्यांनी दिले.


"शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची हमीभावाची रक्कम वेळेत मिळणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे.

प्रलंबित देयकांच्या बाबतीत कोणताही अनावश्यक विलंब सहन केला जाणार नाही, असे मंत्री छगन भुजबळ यांनी यंत्रणांना निर्देश दिले.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शुक्रवार, दि. ०२ ऑक्टोबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



शेटफळ तलावामध्ये पाणी सोडून आवर्तनाच्या मागणीसाठी बावडा येथे शुक्रवारी रास्ता रोको

शेटफळ: दैनिक संध्या

सध्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेटफळ तलाव लाभक्षेत्रातील 10 गावांमध्ये चाऱ्याचा तसेच माणसांना व जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे निरा डावा कालव्यातून तातडीने शेटफळ तलावात पाणी सोडण्यास सुरुवात करून लाभ क्षेत्रासाठी आवर्तन चालु करावे, अन्यथा बावडा येथे संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर शुक्रवारी (दि. 2) सकाळी 9 वा. रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा लाभ क्षेत्रातील 10 गावांतील शेतकरी व शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने इंदापूर तहसीलदारांना सोमवारी निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. शेटफळ तलावातून लाभ क्षेत्रातील बावडा, शेटफळ, भोडणी, वकीलवस्ती, सुरवड, पिठेवाडी, निरनिमगाव, कचरवाडी (बा.), सराटी, लाखेवाडी या गावांसाठी गेली 4 महिन्यांपासून आवर्तन सोडण्यात आलेले नाही. त्यामुळे या गावांमधील जनावरांच्या चाऱ्याचा व सुमारे 50 हजार लोकसंख्येला पिण्याचा पाण्याचा प्रश्न उग्र बनला आहे. गेली 115 वर्षांपासून शेटफळ तलाव हा भाटघर धरणातील पाण्याने पावसाळ्यात भरून घेतला जात आहे. मात्र चालू पावसाळ्यात भाटघर वीर धरण 2 ते 3 वेळा ओव्हर फ्लो होऊन नीरा नदीला पाणी सोडून देण्यात आले, मात्र शेटफळ तलाव पाण्याने भरून घेण्यात आला नाही, त्यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे. सदर अन्याय दूर करण्यासाठी शेटफळ तलाव तातडीने वीर-भाटघर धरणातील उपलब्ध पाण्याच्या टक्केवारी एवढा भरून द्यावा, अन्यथा शासनाला गावोगावी टँकर व चारा छावण्या सुरु कराव्या लागतील, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. जलसंपदा विभागाचे अधिकारी वारंवार तलाव भरून देण्याचे आश्वासन देत आहेत, मात्र कृती करीत नसल्याने शेतकऱ्यांची फसवणूक सुरु आहे. त्यामुळे लाभक्षेत्रातील 10 गावांमधील नागरिकांचा व लाखो जनावरांच्या पिण्याचा पाण्याचा व चाऱ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी निरा डावा कालव्यातून तातडीने पाणी तलावात सोडण्यास सुरुवात करून लाभ क्षेत्रासाठी आवर्तन चालु करावे, अशी मागणी या निवेदनामध्ये करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, खा. सुप्रिया सुळे, जिल्हाधिकारी पुणे, अधिक्षक अभियंता पुणे पाटबंधारे मंडळ पुणे, कार्यकारी अभियंता निरा डावा कालवा पुणे उपअभियंता उपविभाग निमगाव केतकी, पोलीस निरिक्षक इंदापूर व निरा नरसिंहपूर आदींना देण्यात आले आहे. दरम्यान, तहसीलदारांना निवेदन देण्यापूर्वी या संदर्भात बावडा येथील श्री शिवाजी विद्यालयाच्या सभागृहामध्ये 10 गावातील शेतकऱ्यांची बैठक झाली. यावेळी प्रशांत पाटील, उदयसिंह पाटील, मनोज पाटील, दत्तात्रय घोगरे यांनी मार्गदर्शन केले. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे हेही शेटफळ तलावामध्ये पाणी सोडणे व आवर्तनासाठी आग्रही असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्रारंभी आप्पासाहेब जगदाळे हेही उपस्थित होते. आभार पवनराजे घोगरे यांनी मानले.

आरटीई प्रवेशासाठी वास्तव्याचा खोटा पत्ता, १४ जणांवर गुन्हा दाखल

राजगुरुनगर : दैनिक संध्या

आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेंतर्गत शाळेत प्रवेश मिळविण्यासाठी रहिवासी पत्त्याबाबतची खोटी कागदपत्रे सादर करून शासनाची दिशाभूल व फसवणूक केल्याच्या आरोपावरून खेड पोलिसांनी १४ पालकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी खेड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अमोल विजय जंगले यांनी खेड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्च २०२६ ते मे २०२६ या कालावधीत राजगुरुनगर येथील पंचायत समितीच्या तालुकास्तरीय समितीकडे आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेसाठी काही पालकांनी त्यांच्या पाल्यांच्या प्रवेशासाठी रहिवासी पुराव्याची कागदपत्रे सादर केली. संबंधित कागदपत्रांवरील पत्त्यावर पालक वास्तव्यास नसतानाही त्या आधारे आरटीई अंतर्गत प्रवेश घेतल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी गणेश अरुण साळुंखे, सतीश दत्तात्रय गुंड,उत्तरेश्वर आधुबा गोचडे, योगेश बबन सातपुते, राहुल भगवान चौधरी, अजय मच्छिंद्रनाथ विरकर, संदीप दादा शिंदे, रमाकांत आनंदराव चव्हाण, सर्व रा. हनुमानवाडी, केळगाव, आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे, समीर रामचंद्र गोरे रा. आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे, वैभव होणाजी मोहिते रा. शेलपिंपळगाव, ता. खेड, जि. पुणे, दयानंद फकीरप्पा कुंभार रा. यमुनानगर, आंबेठाण रोड, चाकण, ता. खेड, जि. पुणे, संदीप भीमराव कांदेकर -पाटील रा. ऐश्वर्या अंगण, आंबेठाण पार्क, ता. खेड, जि. पुणे, निलेश देवराव शेकार – रा. गणेश कॉलनी, शिक्रापूर रोड, दत्तवाडी, भोसे, ता. खेड, जि. पुणे, अंगद दिलीप राऊत, आंबेठाण चौक, चाकण, ता. खेड, जि. पुणे. यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील दहा पालकांच्या पाल्यांसाठी डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूल, आळंदी देवाची येथे, तर उर्वरित चार पालकांच्या पाल्यांसाठी पोदार इंटरनॅशनल स्कूल, आंबेठाण येथे आरटीई अंतर्गत प्रवेशासाठी कागदपत्रे सादर केल्याचे पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे. याप्रकरणी खेड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४), ३३६(३) व ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भरधाव स्विफ्टचा कहर ! जोरदार धडक



कवठे येमाई : दैनिक संध्या

मलठण–कवठे येमाई अष्टविनायक मार्गावरील मुंजाळवाडी जिल्हा परिषद शाळेजवळ भरधाव स्विफ्ट कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दोघांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात संतोष शंकर मुंजाळ यांचा मृत्यू, तर सबाजी भागा मुंजाळ (वय ३८) जखमी झाले आहेत. शिरूर पोलिसांच्या माहितीनुसार, स्विफ्ट कार क्रमांक एमएच-०४-एफझेड-७७७० चालक वैभव ढोमे (रा. पिंपरखेड) याने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून स्पीडब्रेकर वर वेग कमी न करता दोघांना धडक दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. धडक दिल्यानंतर जखमींना घटनास्थळी सोडून चालकाने अपघाताची माहिती न देता वाहनासह पलायन केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पांडुरंग बबन मुंजाळ यांच्या फिर्यादीवरून शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक राहुल भागवत तपास करीत असून पोलीस हवालदार गवळी यांनी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही केली असून पुढील तपास शिरूर पोलीस स्टेशनकडून सुरू आहे.

विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व्यासपीठ



■ कळंब (दै. संध्या)

विश्वासराव रणसिंग महाविद्यालयात 'सायन्स फेस्ट'; १३५ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

उत्कृष्ट प्रकल्प व पोस्टर सादरीकरण करणारे विद्यार्थी

माध्यमिक विभाग :

१) सेजल भगवान थोरवे, मोनिका धनाजी विरकर – माध्यमिक विद्यालय, म्हसोबाचीवाडी
२) श्रुती अमोल मोरे – माध्यमिक विद्यालय, तावशी
३) सोहम गजानन राऊत, प्रेम दादासो जाधव – माध्यमिक विद्यालय, तावशी ज्युनिअर पोस्टर :
१) स्वराली सचिन शेलार – एल. जी. बनसुडे माध्यमिक विद्यालय, पळसदेव
२) प्राची प्रमोद पालवे – श्री वर्धमान विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज, वालचंदनगर
३) मनस्वी राजेश कदम, अक्षदा भिमराव साळवे – श्री वर्धमान विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज, वालचंदनगर सीनियर पोस्टर :
१) दीक्षा प्रकाश कचरे, साक्षी संजय नामदास – श्रीमती रत्नप्रभादेवी पाटील महाविद्यालय, बावडा
२) भारती पंडित बोडरे – श्रीमती रत्नप्रभादेवी पाटील महाविद्यालय, बावडा
३) मेघा मोहन रासकर – विश्वासराव रणसिंग महाविद्यालय, कळंब ज्युनिअर मॉडेल :
१) बाळकृष्ण नवनाथ घुले, शंकर बापू मोहिते, समर्थ नितीन कणसे – कर्मयोगी शंकरराव पाटील विद्यालय, कुरवली
२) सार्थक बापूराव जाधव, यशराज रामदास कुंभार, आदित्य बाळराजे भोसले – श्री वर्धमान विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज, वालचंदनगर
३) रोहन शामराव जाधव, भाग्यवर्धन मनोज खिलारे, अर्जुन हनुमंत जाधव, मुस्तकीम जमीर शेख – बाबासाहेब फडतरे इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कॉलेज, कळंब सीनियर मॉडेल :
१) समीक्षा मनोज किर्दक, वैष्णवी दीपक वाघ – विश्वासराव रणसिंग महाविद्यालय, कळंब
२) प्रणाली पोपट शिंदे – विश्वासराव रणसिंग महाविद्यालय, कळंब
३) राजेश्वरी रवींद्र जाधव, सानिका गजानन रणमोडे – विश्वासराव रणसिंग महाविद्यालय, कळंब

विश्वासराव रणसिंग महाविद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज, वालचंदनगर येथे दि. ३० सप्टेंबर रोजी 'सायन्स फेस्ट'चे आयोजन करण्यात आले. आयक्यूएसी, सायन्स फोरम आणि बेस्ट प्रॅक्टिस कमिटीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध विद्यालये व महाविद्यालयांतील तब्बल १३५ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

सायन्स फेस्टचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष प्रकाश कदम, सचिव वीरसिंह रणसिंग आणि विश्वस्त शंकर रणसिंग यांच्या हस्ते झाले. यावेळी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इंदापूरचे डॉ. बिभीषण महाडिक, यशवंतराव चव्हाण ज्युनिअर कॉलेज, फलटणचे प्रा. धनंजय सस्ते, प्राचार्य डॉ. अशोक काळंगे, उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर गुळीग, डॉ. प्रशांत शिंदे, समन्वयक प्रा. आकाश झगडे यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व मार्गदर्शक उपस्थित होते. वीरसिंह रणसिंग यांनी विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व स्पष्ट करत विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे वळण्याची गरज व्यक्त केली. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, नव्या संशोधन कल्पनांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच सैद्धांतिक ज्ञानाला प्रत्यक्ष प्रयोगांची जोड देणे, हा 'सायन्स फेस्ट'चा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

या विज्ञान महोत्सवात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, संगणक विज्ञान आणि पर्यावरणशास्त्र या विषयांवरील विविध मॉडेल्स व पोस्टर्स विद्यार्थ्यांनी सादर केले. प्रत्यक्ष प्रयोगांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक संकल्पना सोप्या पद्धतीने मांडल्या. प्रकल्पांचे मूल्यमापन डॉ. बिभीषण महाडिक आणि प्रा. धनंजय सस्ते यांच्या तज्ज्ञ समितीने नाविन्य, उपयोगिता, सादरीकरण आणि वैज्ञानिक स्पष्टता या निकषांवर केले. उत्कृष्ट प्रकल्प व पोस्टर सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे व पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

या उपक्रमात नंदिकेश्वर विद्यालय, जंक्शन, कर्मयोगी शंकरराव पाटील विद्यालय, कुरवली, श्री वर्धमान विद्यालय, वालचंदनगर, एन.ई.एस. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, निमसाखर, एल.जी. बनसुडे विद्यालय, पळसदेव, श्रीमती रत्नप्रभादेवी पाटील महाविद्यालय, बावडा, वालचंद विद्यालय, कळंब तसेच विश्वासराव रणसिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. बक्षीस वितरणाचे प्रास्ताविक डॉ. प्रशांत शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अभिजीत शिंगाडे, प्रा. आकांक्षा मेटकरी आणि प्रा. सायली दळवी यांनी केले. आभार प्रा. आकाश झगडे यांनी मानले.

श्री सोमेश्वर कारखान्याच्या लढाईची सुरुवात दादांच्या आशीर्वादाने!



■ बारामती (दै. संध्या)

■ सोमेश्वर विकासपुरुष स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृतीस्थळी जय अजितदादा पवार यांच्यासह सर्व उमेदवारांनी केले अभिवादन

श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर श्री सोमेश्वर विकासपुरुष अजितदादा पवार पॅनलच्या सर्व उमेदवारांसोबत युवा नेते जय अजितदादा पवार यांनी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृतीस्थळी जाऊन अभिवादन केले. यावेळी बोलताना जय पवार म्हणाले, "दादा आज आपल्यात नाहीत; पण सोमेश्वरच्या प्रत्येक घडामोडीत त्यांची आठवण आहे, त्यांच्या कामाचा ठसा आहे आणि त्यांच्या विचारांची प्रेरणा आहे. १९९१ पासून सोमेश्वरच्या विकासाचा प्रवास दादांनी आपल्या कर्तृत्वाने घडवला.""आज त्यांच्या पश्चात ही निवडणूक लढताना मनात एकच भावना आहे—दादांनी जपलेला विश्वास कायम ठेवायचा आणि सोमेश्वरच्या विकासाची ही वाटचाल पुढे न्यायची. दादांच्या स्मृतींना नमन करून,त्यांच्या आशीर्वादाची साथ घेऊन सोमेश्वरच्या विकासासाठी नवी उमेद,नवा निर्धार आणि नवी जबाबदारी घेऊन आम्ही सज्ज आहोत," असे जय पवार यांनी सांगितले. "दादा, तुमची उणीव कायम जाणवेल; पण तुमचा विचार आणि तुमची प्रेरणा सदैव आमच्यासोबत राहील," अशा भावनिक शब्दांत जय अजितदादा पवार यांनी स्वर्गीय अजितदादांच्या स्मृतींना अभिवादन केले.

बारामतीच्या क्रिशिव लकडेला सुवर्णपदक



बारामती (दै. संध्या) : जिल्हास्तरीय पहिली इंटरस्कूल स्केटिंग मॅरेथॉन चॅम्पियनशिप 2026 या बारामती मध्ये झालेल्या स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळाल्याबद्दल आणि आता राज्यस्तरीय स्केटिंग मॅरेथॉन चॅम्पियनशिप 2026 साठी निवड झाल्याबद्दल क्रिशिव रविना केशव लकडे याचे अभिनंदन करण्यात येत आहे.क्रिशिव हा विद्या प्रतिष्ठानचे डॉ.सायरस पूनावाला सीबीएससी स्कूल, बारामतीचा विद्यार्थी आहे.

सस्तेवाडी ग्रामपंचायतीपुढे ग्रामस्थांचे लक्षवेधी आंदोलन

■ कथित गैरप्रकारांच्या चौकशीची मागणी

■ पंचायत समिती बारामती कडून गैरप्रकारावर पांघरून घालण्याचा आटापिटा कशासाठी?



■ सस्तेवाडी (बारामती) (दै. संध्या)

सस्तेवाडी ग्रामपंचायत येथे दि. २१ ऑगस्ट रोजी झालेल्या ग्रामसभेत ग्रामसभा तहकूब व्हावी या हेतूने उपस्थित काही ग्रामस्थांच्या सह्या होण्या आधीच उपस्थिती नोंदवही मध्ये सुरु असलेली सह्या घेण्याची प्रक्रिया थांबवण्यात आली व ग्रामसभा तहकूब करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावर उपस्थित काही ग्रामस्थांनी उपस्थित नोंदवही मध्ये सर्व ग्रामस्थांच्या सह्या अद्याप झालेल्या नसल्याची व सह्यांची प्रक्रिया सुरु असल्याची बाब अनेकदा ग्रामसभा अध्यक्ष व सचिव यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर अधिकृत ग्रामसभा तहकूब अथवा समाप्तीची घोषणा न करता ग्रामसभेतून संबंधितांनी काढता पाय घेतला.या घडलेल्या प्रकार बाबतचे संपूर्ण व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले असून ते आमच्याकडे उपलब्ध असल्याचे आंदोलकांनी सांगितले.केवळ ग्रामस्थांच्या प्रश्नांना सामोरे जावे लागू नये यासाठी जाणीवपूर्वक उपस्थित काही ग्रामस्थांच्या सह्या घेण्यास टाळाटाळ करून ग्रामसभा तहकूब करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून यामुळे १५ वा वित्त आयोग निधीतील विकासकामे,पूर्ण झालेली कामे,अपूर्ण कामे,कामाचा दर्जा, यासाठी करण्यात आलेला खर्च, अंदाजपत्रक,मंजुरी,खर्चाची बिले व देयके याशिवाय ग्रामपंचायत हद्दीतील अंतर्गत सिमेंट रस्त्यांवर बेकायदेशीर खोदकामासंबंधीची कागदपत्रे,परवानग्या,घरकुल लाभार्थी यादी, अजेडा वरील विषय इत्यादी.. विषयासंबंधी ग्रामपंचायत प्रशासनाकडून अधिकृत माहिती मिळालेली नाही.

याशिवाय ग्रामसभा अजेंड्यावर सही असणारे ग्रामपंचायत अधिकारी हे प्रत्यक्ष ग्रामसभेला हजर न राहता ग्रामसभेच्या वेळी प्रत्यक्ष कुठे उपस्थित होते याची चौकशी करण्यात यावी, १५ वा वित्त आयोगाच्या निधीचा प्राप्त निधी,खर्च,मंजूर कामे,प्रत्यक्ष झालेली कामे,बिले व देयके यांची चौकशी व पडताळणी करण्यात यावी,ग्रामपंचायतच्या विकासकामांवरील खर्च व संबंधित कागदपत्रांची संपूर्ण तपासणी करण्यात यावी,दि. २१ ऑगस्ट रोजी झालेल्या ग्रामसभा ठिकाणचे उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात यावे व आवश्यक असल्यास जतन करण्यात यावे, गावातील रस्त्यांच्या खोदकामा संबंधीच्या ताक्रचीची चौकशी करून दोषींवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी,घरकुल लाभार्थी यादी,लाभार्थी निवडीचे निकष व पत्र लाभार्थ्यांना मिळालेल्या लाभाची चौकशी करण्यात यावी, २१ ऑगस्ट रोजीची ग्रामसभा नियमानुसार पार पडलेली नसल्यास,सक्षम अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली ग्रामस्थांना योग्य पूर्वसूचना देवून नवीन ग्रामसभा घेण्यात यावी इत्यादी.. मागण्या आंदोलकांकडून करण्यात आल्या आहेत. या सर्व प्रकाराची चौकशी व्हावी यासाठी तक्रार अर्ज करूनही ठोस कार्यवाही होत नसल्याने दि. ३० सप्टेंबर रोजी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामपंचायत सस्तेवाडी कार्यालयासमोर सस्तेवाडी ग्रामस्थ निखिल नाटकर, नानासो जगदाळे,साहेबराव ढोणे व ग्रामस्थांकडून लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.यावेळी सस्तेवाडी ग्रामस्थ विकास ठोंबरे,वैभव मोरे, संतोष गाढवे,गणेश होळकर, हनुमंत ढोणे,सौरव ढोणे,चंद्रकांत शिंदे इत्यादी ग्रामस्थ उपस्थित होते. आंदोलनस्थळी आंदोलकांना भेटण्यास आलेले विस्तार अधिकारी आदित्य शेटे यांनी आंदोकांशी चर्चा करण्यास टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आले तसेच आंदोलकांशी असभ्य वर्तन करीत "मी इथे फक्त हे पत्र द्यायला आलो आहे.तुम्हाला काही सांगायचे असेल तर लेखी सांगा, आधी मला हे पत्र घेऊन याची पोच द्या."असे म्हणून चर्चा करण्यास टाळाटाळ केली.

श्रीलंका ठरणार डेस्टिनेशन वेडिंगचे आकर्षक ठिकाण

■ पुणे (दै. संध्या)



तीन शहरांत विशेष उपक्रम

श्रीलंका पर्यटन प्रोत्साहन ब्युरोने (एसएलटीपीबी) हैदराबाद, सुरत आणि पुणे येथे आयोजित केलेल्या तीन शहरांतील डेस्टिनेशन वेडिंग रोडशोची यशस्वी सांगता केली. या माध्यमातून भारतातील वेडिंग क्षेत्रातील व्यावसायिकांसमोर श्रीलंकेचे डेस्टिनेशन वेडिंगसाठीचे आकर्षक पर्याय आणि संधी सादर करण्यात आल्या. या रोडशोमध्ये वेडिंग प्लॅनर्स, ट्रॅव्हल क्षेत्रातील व्यावसायिक आणि प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी सहभागी झाले. या उपक्रमाद्वारे श्रीलंकेला एक प्रीमियम आणि बहुआयामी डेस्टिनेशन म्हणून सादर करण्यात आले, जिथे जोडप्यांना आपल्या विवाहसोहळ्याचे रूपांतर कुटुंबीय आणि मित्रपरिवारासोबत आनंददायी विवाहसोहळा तसेच अविस्मरणीय सुट्टीच्या अनुभवात करता येते. उष्णकटिबंधीय समुद्रकिनारे, आलिशान रिसॉर्ट्स, ऐतिहासिक वारसा स्थळे, धुक्याने वेढलेल्या पर्वतरांगा आणि आकर्षक व अद्वितीय ठिकाणांमुळे श्रीलंका डेस्टिनेशन वेडिंगसाठी विविध पर्याय उपलब्ध करून देते. जोडपी हिंदी महासागराचे विहंगम दृश्य डोळ्यांसमोर ठेवून विवाहबंधनात अडकू शकतात, सेंट्रल हायलँड्समध्ये विवाहसोहळा साजरा करू शकतात, ऐतिहासिक वारसा असलेल्या वास्तूंमध्ये समारंभ आयोजित करू शकतात किंवा आलिशान रिसॉर्ट्समध्ये अनेक दिवसांचा भव्य विवाहसोहळा आयोजित करू शकतात. दक्षिण किनारपट्टी आणि कोलंबोपासून कँडी आणि नुवारा एलिया पर्यंत, हे ठिकाण प्रत्येक जोडप्याच्या व्यक्तिमत्त्व, परंपरा आणि स्वप्नांनुसार विवाहसोहळ्याचे नियोजन करण्याचे स्वातंत्र्य देते. श्रीलंकेची डेस्टिनेशन वेडिंगची संकल्पना अनुभवी वेडिंग प्लॅनर्स आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील व्यावसायिकांमुळे अधिक सक्षम झाली आहे. हे व्यावसायिक विवाहस्थळ, सजावट, केटरिंग, मनोरंजन, फोटोग्राफी, वाहतूक आणि पाहुण्यांचे व्यवस्थापन अशा सर्व बाबींचे एकत्रित नियोजन आणि आयोजन करतात. श्रीलंकेतील वेडिंग इंडस्ट्री भारतीय विवाहपरंपरा, वैयक्तिक आवडीनुसार मेन्यू, थीमवर आधारित सजावट तसेच लग्नापूर्वी आणि लग्नानंतरच्या सेलिब्रेशनसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देऊ शकते. त्यामुळे कुटुंबीयांना परदेशात विवाहसोहळा आयोजित करताना अधिक आत्मविश्वास आणि विश्वासार्हतेचा अनुभव मिळतो. या रोडशोमध्ये 'विवाहसोहळ्यासोबत सुट्टीचा आनंद' या संकल्पनेचे आकर्षणही अधोरेखित करण्यात आले. पाहुणे विवाहसोहळ्याच्या आनंदासोबत समुद्रकिनाऱ्यावरील सहली, सांस्कृतिक पर्यटन, वन्यजीव सफारी, वेलनेस अनुभव, निसर्गरम्य प्रवास, खरेदी तसेच विविध पाककृतींचा आस्वाद घेण्याचा आनंद घेऊ शकतात. भारतामधून सहज उपलब्ध असलेली कनेक्टिव्हिटी आणि विविध प्रकारच्या निवासाच्या सुविधा यामुळे कुटुंबीयांना एकत्रितपणे विवाहसोहळा साजरा करण्यासोबतच आंतरराष्ट्रीय पर्यटनस्थळाचा सहज आणि आरामदायी अनुभव घेता येतो.